## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांबाबत सुप्रीम कोर्टाचा इशारा

**नवी दिल्ली :** देशभरात रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांचे हल्ल्याचे प्रकरण वाढताना दिसत आहेत यावर



सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत कठोर इशारा दिला आहे. कुत्रा चावल्याच्या होणाऱ्या मृत्यू आणि गंभीर दुखापतीमुळे फक्त सरकारच जबाबदार नसणार, तर भटक्या कुत्र्यांना खाऊ घालणाारे ही प्राणीप्रेमी जबाबदार असणार, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. गेल्या पाच वर्षांत भटक्या प्राण्यांबाबत असलेल्या नियमांची अंमलबजावणी करण्यात राज्य सरकारांनी हलगर्जीपणा केल्याचा ठपकाही न्यायालयाने ठेवला आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त करत, यापुढे कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशारा दिला आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७९

www.ramprahar.com

◆ गुरुवार, १५ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


'निवडणूक प्रचारात चारित्र्य हनन करणाऱ्यांवर कारवाई' / २

पीरवाडी समुद्र किनाऱ्यावरील संरक्षक कठडा ढासळला / ३

माणगावच्या जुन्या टपाल कार्यालयाची दयनीय अवस्था / ७


# परप्रांतियांना मारणे म्हणजे विकास नव्हे!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ठाकरे बंधूंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी माणसाचा विकास केला म्हणजे काय केलं? २५ वर्षांत मराठी माणसाला मुंबईबाहेर जावं लागलं, हा विकास नाही. परप्रांतियांना दोन थोबाडीत मारणे म्हणजे विकास नाही असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ठाकरे बंधूंना लगावला. तसेच आमचं हिंदुत्व हे पूजा पद्धतीवर अवलंबून नाही, तर प्राचीन भारतीय जीवनपद्धती माणणाऱ्यांना आम्ही हिंदू मानतो असेही ते म्हणाले.

ठाकरे बंधूंनी मराठी आणि अमराठी असा भेदभाव करत निवडणूक लढण्याचा खूप प्रयत्न केला, पण मराठी माणूस संकुचित नाही. महाराष्ट्रात क्षेत्रीय अस्मिता आहे, मराठी भाषा अभिमान आहे. कल्याण झाले पाहिजे आणि मराठी माणूस हा महाराष्ट्रात सुरक्षित असला पाहिजे, असे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत भाजपच सर्वात मोठा पक्ष असेल आणि आम्हाला मुंबईसह सगळ्याच महापालिकांमध्ये चांगला विजय मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच ठाकरे बंधू एकत्र आल्याचा परिणाम होणार नाही असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्राची जनता पंतप्रधान मोदींच्या सोबत आहे. २६ ते २७ महानगरापालिकांमध्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर



असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**मराठी आणि हिंदू वेगळे नाही**

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही हिंदुत्त्व नाही विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढली. हिंदुत्व आणि विकास वेगळे होऊ शकत नाही. आमचे हिंदुत्व संकुचित नाही. आमचे हिंदुत्व हे पूजा पद्धतीवर आधारित नाही. भारतीय संस्कृती, प्राचीन भारतीय जीवनपद्धती मानणाऱ्यांना आम्ही हिंदू मानतो, आम्ही त्यांना सोबत घेऊ चालू. त्यामुळे मराठी आणि हिंदू हे वेगळे होऊ शकत नाही.

**मुंबईवर महायुतीचाच झेंडा**

महापालिका निवडणुकीतही भाजप सर्वांत मोठा पक्ष होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुंबई महापालिका युती जिंकणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. तसेच पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेही महायुती जिंकणार असल्याचे फडणवीस म्हणाले. ठाकरे बंधूंची युती म्हणजे प्रीतीसंगम नव्हे तर भीतीसंगम असल्याच पुनरुच्चार फडणवीस यांनी केला.

# राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातल्या २९ महापालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहचवण्याची तयारी सुरू आहे.

राज्यातल्या २९ महापालिकांसाठी उद्या सकाळी साडेसात ते साडेपाच दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं दिलेलं मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्रं, स्वातंत्र्य



सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचं जॉब कार्ड, किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे.

मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. त्याठिकाणी मतदानांना जितक्या सदस्यांचा प्रभाग तितकी मतं द्यावी लागणार आहे. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झालं याची खात्री मतदारांना मिळेल.

### ईव्हीएम मशीनसोबत असेल 'पाडू' (पीएडीयू)

मतदानाला एक दिवस शिल्लक असताना राज्य निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची राज्यात चर्चा सुरू आहे. निवडणूक आयोगाने एक नवे मशीन आणले आहे. राज्य निवडणूक आयोगाने ईव्हीएमसोबत मत मोजणीसाठी नवीन मशीन (पीएडीयू)चा वापर करणार असल्याचे सांगितले.

## निवडणुकीसाठी कुणालाही पाठिंबा नाही -मनोज जरांगे



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुंबईसह २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदानाला अवघे काही तास शिल्लक असतानाच मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका मांडली आहे. माझा मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या महापालिकांच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीसह कुणालाही पाठिंबा नाही, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे यांच्या नावानं पत्रकं प्रसिद्ध करून काही राजकीय पक्षांना महापालिका निवडणुकीत पाठिंबा असल्याच्या पोस्ट व्हायरल झाल्या होत्या. यानंतर मनोज जरांगेंनी स्वतः आपली भूमिका मांडली आहे. महायुती किंवा महाविकास आघाडीला असा कोणालाही महापालिका निवडणुकीत माझा पाठिंबा नाही. माझे जुने व्हिडिओ कुणी व्हायरल करत असतील तर ते चुकीचे आहे, कुणीही विश्वास ठेवू नये, असे जरांगेंनी स्पष्ट केले.

# उरण उपनगराध्यक्षपदी भाजपच्या रवी भोईर यांची बिनविरोध निवड

**उरण : वार्ताहर**

उरण नगरपरिषदेच्या उप नगराध्यक्षपदी भाजपचे रवी भोईर यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम म्हात्रे तसेच आमदार महेश बालदी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालकरीता शुभेच्छा दिल्या.

उरण नगर परिषद निवडणूक २ डिसेंबर रोजी झाली होती त्यात २१ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल लागला. त्यात भाजपचे १२ उमेदवार व महाविकास आघाडीचे ९ उमेदवार व





नगराध्यक्ष पदासाठी १ उमेदवार निवडून आले होते. बुधवारी निवडून आलेल्या नगरसेवकांची सर्व साधारणसभा नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली ठेवण्यात आली होती. उपनगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार होती, परंतु उपनगराध्यक्ष पदासाठी एकच अर्ज आल्याने भाजपचे रवी भोईर यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे नगराध्यक्षांनी जाहीर केले.

यानंतर भाजपतर्फे उरण नगर परिषदेपासून मिरवणूक काढण्यात आली होती. पुढे आमदार महेश बालदी यांच्या भाजप संपर्क कार्यलय, स्वामी विवेकानंद चौक, गणपती मंदिर चौक, राजपाल नाका, जरी मरी मंदिर, राघोबा देव मंदिर येथून परत राजपाल नाका, गणपती चौक व पुढे आमदार महेश बालदी कार्यलय येथे सांगता समारोप करण्यात आला. **(पान २वर..)**

## निवडक

### भीषण अपघातात सख्ख्या बहिणींसह पाच जणांचा मृत्यू

**पुणे, नाशिक :** पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी परिसरात बुधवारी दुपारी भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये दोन सख्ख्या बहिणींचा जागीच मृत्यू झाला आहे. पुण्यातील पुनावळे परिसरातील रहिवासी होत्या. दरम्यान, नाशिक जिल्ह्यामध्येही मध्य प्रदेशातील एका मजूर कुटुंबातील मायलेकांचा करुण अंत झाला असून आईसह तिच्या दोन लहान मुलांचा जागीच मृत्यू झाला आहे.

### पंतप्रधान मोदींकडून मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर बॅक टू बॅक पोस्टमध्ये मकरसंक्रांती, माघ बिहू आणि उत्तरायणच्या देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. मकरसंक्रांतीचा हा पवित्र सण तुमचं आयुष्य आंनदाने भरु दे. सर्वांना चांगलं स्वास्थ लाभू दे. समृद्धीचा आशीर्वाद मिळू दे. या आनंदाच्या उत्सवात एकजुटतेचं बंधन अजून मजबूत होऊ दे. सर्वांच्या आयुष्यात सकारात्मकता, समृद्धी येऊ दे, असे पंतप्रधान मोदींनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलेय.

## भारतीय नागरिकांना इराण देश तत्काळ सोडण्याचे आवाहन



### परिस्थिती चिघळली, अडीच हजारांहून अधिक जणांचा आंदोलनात मृत्यू

**तेहरान : वृत्तसंस्था**

इराणमधील भारतीयांना तत्काळ इराण सोडण्याचे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. भारतीय विद्यार्थी, पर्यटक तसेच व्यावसायिकांनी तात्काळ इराणमधून बाहेर पडावे. तसेच आंदोलन सुरू असलेल्या ठिकाणांहून बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आहे.

आंदोलनात अडीच हजारांहून अधिक जणांचा बळी गेला आहे. इराणच्या सुरक्षा दलाने आंदोलन मोडून काढण्यासाठी आंदोलकांवर हिंसात्मक कारवाई केल्याचे वृत्त आहे. तसेच हजारो आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. इराणमध्ये परिस्थिती चिघळली असून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणला आंदोलकांविरोधात सुरू असलेली हिंसा थांबवण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, आंदोलकांविरोधात हिंसक कारवाई केल्यास अमेरिका थेट हस्तक्षेप करेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. इराणवर लष्करी कारवाई, कठोर कारवाई करण्याचा विचार करत असल्याचे ट्रम्प मंगळवारी म्हणाले होते.

**मदतीसाठी संपर्क क्रमांक**

आणीबाणीच्या परिस्थितीत मदतीसाठी भारतीय दूतावासाने विशेष हेल्पलाईन क्रमांक जारी केले आहेत. भारतीय नागरिक खालील क्रमांकांवर संपर्क साधू शकतात: +९८९१२८१०९११५, +९८९१२८१०९१०९, +९८९१२८१०९१०२, +९८९३२१७९३५९

# धावत्या ट्रेनवर क्रेन पडली; २२ जणांचा मृत्यू

**थायलंड : वृत्तसंस्था**

२०२६ मध्ये पहिला भयानक रेल्वे अपघात घडला आहे. धानत्या ट्रेनवर क्रेन पडली आहे. या अपघातात एकावेळी २२ जणांचा मृत्यू झाली आहे. या अपघातामुळे एकच खळबळ उडाली. घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. थायलंडमध्ये हा मोठा रेल्वे अपघातात झाला आहे.

क्रेन कोसळल्याने ट्रेन रुळावरून घसरली. ही ट्रेन थायलंडची राजधानी ते देशाच्या ईशान्य भागात



जात होती. बुधवारी (दि.१४) स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजता बँकॉकच्या ईशान्येला २३० किमी अंतरावर असलेल्या रत्चासिमा प्रांतातील सिखिओ जिल्ह्यात हा अपघात झाला. स्थानिक पोलीस आणि बचाव पथके घटनास्थळी मदतकार्य करत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अपघातस्थळी हाय-स्पीड ट्रेन लाईनचे बांधकाम सुरू होते.

या वेळी ही मोठी दुर्घटना घडली. बँकॉकच्या दिशेने ट्रेन येत होती. या वेळी बांधकाम क्रेन ट्रेनवर थेट पडली. क्रेन पडल्याने ट्रेन रुळावरून घसरली आणि तिच्या काही डब्यांना आग लागली. पोलिसांनी सांगितले की आग आटोक्यात आणण्यात आली आहे आणि बचाव कार्य सुरू आहे.

थायलंड पोलिसांनी एका निवेदनात २२ जणांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. या अपघातात ७९ जण जखमी झाले आहेत, त्यापैकी आठ जणांची प्रकृती गंभीर आहे.

## दहावी-बारावीच्या १०७ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा केंद्रांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. राज्यभरातील दहावीच्या ३१ आणि बारावीच्या ७६ परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. या कारवाईत सर्वाधिक केंद्र हे छत्रपती संभाजीनगर विभागातील असल्याने समोर आले आहे.

कारवाईचे कारणपरीक्षेत गैरप्रकार थांबवण्यासाठी आणि कॉपीसारख्या शैक्षणिक उल्लंघनांना प्रतिबंध करण्यासाठी राज्य मंडळाने कॉपीमुक्त अभियान राबवले आहे. या अंतर्गत परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची तपासणी, भरारी पथकांच्या भेटी, जिल्हास्तरीय निरीक्षण, ड्रोनद्वारे लक्ष, पोलीस बंदोबस्त, तसेच परीक्षा केंद्राबाहेर दृकश्राव्य चित्रीकरण या उपाययोजना केल्या जातात. पुढील नियमावलीनुसार, भरारी पथकांनी गैरप्रकार पकडल्यास त्या केंद्रांची मान्यता रद्द केली जाते, अशी सूचना मागील वर्षी राज्य मंडळाने दिलेली होती.

### पतंगोत्सव



**अलिबाग : मकरसंक्रांतीच्या निमित्ताने वरसोली समुद्रकिनारी बच्चेकंपनी व महिलांनी पतंगबाजीचा आनंद लुटला.** (छाया : जितू शिगवण)

## भाजपच्या विचारधारा उगमस्थानीच 'मराठी'

### प्रदेशाध्यक्ष चव्हाणांनी घेतला विरोधकांचा समाचार



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची विचारधारा आणि मराठी माणूस हे समीकरण अविभाज्य आहे. आमचे मराठीपण हे केवळ शब्दांपुरते मर्यादित नसून, ते मराठी संस्कृती, अस्मिता आणि सकारात्मकतेचा प्रसार करणारे 'अनेकवचनी' व व्यापक आहे, असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. यावेळी त्यांनी मराठी भाषेच्या मुद्द्यावरून राजकारण करणाऱ्या विरोधकांचा कडक शब्दांत समाचार घेतला.

विरोधकांवर टीका करताना चव्हाण म्हणाले की, मराठी भाषेच्या नावाखाली राजकारण करणे थांबवा. हा काही 'विषामृत' खेळ नाही. विरोधकांची भूमिका नकारात्मकतेने भरलेली असून, ज्ञानेश्वर माऊलींच्या 'विश्वात्मके देवे' या वैश्विक तत्त्वाशी त्यांची कोणतीही बांधिलकी नाही, हेच त्यांच्या वागण्यातून सिद्ध होते.

एक देशभक्त आणि संस्कारित पिढी तयार करण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत, असे आवाहनही रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले. आमचे मराठीपण हे संकुचित नसून सर्वसमावेशक आहे, असा पुनरुच्चार त्यांनी शेवटी केला.

## महाराष्ट्रात तुरळक पावसाचा अंदाज

**मुंबई :** संपूर्ण महाराष्ट्राभर सध्या हवामानाची चंचलता पाहायला मिळत आहे. मुंबईत थंडीचा जोर काहीसा कमी झाला असला तरी हवेत गारवा वाटत आहे. दरम्यान, हवामान खात्याने पुढील ७२ तास महाराष्ट्रासाठी महत्त्वाचे असल्याचा इशारा दिला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने दक्षिण भारतातील काही भागांत जोरदार वारे आणि पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रावरही होण्याची शक्यता आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात पावसाची शक्यता नसली, तरी ढगाळ वातावरण, जोरदार वारे आणि काही ठिकाणी तुरळक पावसाच्या सरी कोसळू शकतात. दरम्यान, काही ठिकाणी पाऊस पडला.

## विराट कोहलीची ऐतिहासिक भरारी

### सचिनचा १७ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला



**राजकोट : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या त्याच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळातून जात आहे. मैदानावर पाऊल ठेवताच नवनवीन विक्रम प्रस्थापित करण्याचा जणू विराटचा पायंडाच पडला आहे. आता न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात विराटने 'क्रिकेटचा देव' मानल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरला मागे टाकत एक मोठा पराक्रम केला आहे. तब्बल १७ वर्षांनंतर एका भारतीय फलंदाजाला हे यश मिळाले आहे.

विराट पहिल्या वनडेत ९३ धावांवर बाद झाला. विराटने यासह भारताकडून न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये सचिनच्या सर्वाधिक धावांची बरोबरी केली होती. त्यामुळे विराटला दुसऱ्या सामन्यात सचिनला मागे टाकण्यासाठी अवघ्या एक धावेची गरज होती. विराटने राजकोटमध्ये आपल्या खेळीतील पहिल्या चेंडूवर चौकार ठोकत सचिनचा महाविक्रम आपल्या नावावर केला. विराटने यासह सचिनच्या नावावर असलेला सर्वाधिक धावांचा विक्रम मोडीत काढला. विराट यासह न्यूझीलंडविरुद्ध सर्वाधिक एकदिवसीय धावा करणारा दुसरा फलंदाज ठरला.

# निवडणूक प्रचारात चारित्र्य हनन करणाऱ्यांवर कारवाई करणार -जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

नगरपरिषदांच्या निवडणूकीत आलेला अनुभव पहाता जिल्हा परिषद निवडणूकीत कडक धारेण अवलंबले जाणार आहे. प्रत्येक ठिकाणी चोख पोलीस बंदेबस्त ठेवण्यात येईल. निवडणूक प्रचारात जर कुणी वैयक्तीक टिका करून एखाद्याचे चारित्र्या हनन करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, अशी महिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी बुधवारी (दि. १४ ) दिली.



राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषदांच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाही केला आहे. रायगड जिल्हा परिषदेची निवडूकी घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या तरयारीची महिती देण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्हाकिधारी कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी त्यांनी ही महिती दिली.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गटासाठी तर १५ पंचायात समित्यांच्या ११८ गणांसाठी निवडणूक होणार आहे. १६ जानेवाारीपासून उमेदवर अर्ज देण्यात येतील व स्विकले जातील. २२ जानेवारीला अर्जंची छाननी होईल. २७ जानेवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २७ जानेवारीला उमेदवारांची नावे जाहीर केली जातील. ५ फेब्रुवारी रोजी मतदान होईल. १७ लाख ३८१ मतदार २३२३ मतदान केंद्रांवर मतदान करतील . सर्व तालुक्यात पिंक मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. निवडणूकी सुरळीत पारपडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. जिल्हा परिषद व १५ पंचायत समिती निवडणूकांसाठी १५ नवडणूक निर्णय अधिकारी व १५ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकार्यांची नेमणूक करण्यात आली आहे. संबंधीत तालुक्यांच्या ठिकणी तयार करण्यात आलेल्या मतमोजणी केंद्रांवर ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता मतमोजणीला सुरूवात होईल.

उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र पारंपारीक ऑफलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. मतदारास एकूण २ मत देण्याचा अधिकार राहील. पहिले मत जिल्हा परिषद सदस्यास दुसरे मत पंचायत समिती सदस्यास असे मतदान करावे लागणा आहे. राखीव प्रवर्गातून निवडणूक लढविणार्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतू, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे प्रस्ताव सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची उमेदवारास मुभा असेल.

# विद्यार्थी व पालकांनी एकत्र येत केला लोकशाहीच्या मतदानाचा जागर

**नवी मुंबई : बातमीदार**

रविवारी सुट्टीच्या दिवशी शालेय परिवर्तन स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाळे येथे जमलेल्या पहिली ते आठवीतील ७०० हून अधिक विद्यार्थी आणि ५०० हून अधिक पालकांनी एकत्र येत १५ जानेवारी रोजी होणा-या नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणूकीत सर्वांनी मतदान करावे यादृष्टीने 'मतदान जागरुक दूत' बनून काम करण्याची प्रतिज्ञा घेतली. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते आपल्या पालकांच्या छातीवर 'जागरूक मतदार'असे बिल्ले लावले व आम्ही जागरूक झालो आहोत, आता तुम्हीही व्हा असे भावनिक आवाहन केले.



पालकांनी केवळ स्वतः मतदान करावे एवढ्यावरच न थांबता, प्रत्येक पालकाने आपल्या परिसरातील, नातेवाईकांमधील किमान १० जणांना मतदानासाठी प्रोत्साहित करावे असे उद्दिष्ट ठरविण्यात आले. आमची मुले गेल्या काही दिवसांपासून घरात मतदानाचे महत्त्व सांगत आहेत. आज त्यांच्या हाताने मतदार बिल्ला लावून घेताना खूप अभिमान वाटला. आम्ही स्वतः तर मतदान करणारच, पण इतरांनाही सोबत नेऊ अशी उत्स्फुर्त प्रतिक्रिया पालकांनी याप्रसंगी दिली.

हा विशेष कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका स्नेहल विशे, अविनाश जाधव, सनी पाटील, दिनेश भोये व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण घणसोली विभागात राबविल्या जात असलेल्या स्वीप मोहीमेचे सुयोग्य नियोजन केले आहे

# नवी मुंबई पालिका निवडणुकीसाठी सज्ज : आयुक्तांनी घेतला तयारीचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता दि. १५ जानेवारी २०२६ रोजी, सकाळी ७.३० ते सायं. ५.३० वाजता या वेळेत मतदान होत असून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व सुव्यवस्थित रितीने पार पाडण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका सज्ज असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामाचा वेळोवेळी बारकाईने आढावा घेतला आहे.

निवडणूकीच्या आदल्या दिवशी १४ जानेवारी रोजी आठही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत निवडणूकीसाठी मतदान केंद्रांवर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या पथकांकडे निवडणूक साहित्य वितरण व्यवस्थित रितीने झाले असून सर्व पथके आपापल्या मतदान केंद्रावर पोहचली आहेत. १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायं. ५.३० या वेळेत मतदान होणार असून प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन महापालिका आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

प्रत्येक केंद्राच्या बाहेर वोटर अस्टिन्टन्ट बूथ लावले असून तेथे



संबंधित बीएलओ हे मतदारांना सहाय्य करणार आहेत. मतदान केंद्रांवर मतदारांना सहाय्यासाठी २५० हून अधिक स्वयंसेवक कार्यरत. दिव्यांग, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला यांना मतदानासाठी प्राधान्य देण्यात येणार.

तान्हे बाळ व लहान मुलांसाठी प्रत्येक मतदान केंद्रांच्या ठिकाणी आशा स्वयंसेविका यआंची नियुक्ती केली असून तेथे मतदान करेपर्यंत लहान मुलांची काळजी घेण्यात



येईल.मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास मनाई. चुकून सोबत आणला असल्यास तो बाहेर ठेवण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मोबाईल लॉकर पाऊच व्यवस्था केली आहे .

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व मतदान केंद्रांचे वेबकास्टिंग मतदान केंद्रे व परिसर १२५० सीसीटिव्हीव्दारे सुरक्षित. त्यावर महानगरपालिका मुख्यालय, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस आयुक्तालय येथून थेट देखरेख ठेवली जाणार आहे.

मतदान व मतमोजणीची माहिती प्रसार माध्यमांना विहित वेळेत देण्यासाठी महापालिका मुख्यालयात प्रसारमाध्यम कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे आठही मतमोजणीच्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामार्फत पत्रकार कक्ष स्थापन केले आहेत.

**निवडणूक विषयक महत्वाचे**

मतदार संख्या - ९,४८,४६०
पुरुष - ५,१६,२६७
महिला - ४,३२,०४०
इतर - १५३
एकूण २८ प्रभाग
त्यामधील १ ते २७ क्रमांकाचे प्रभाग ४ सदस्यीय आणि २८ क्रमांकाचा प्रभाग ३ सदस्यीय
२८ प्रभागांमध्ये ५०० उमेदवार निवडणूकीसाठी उभे आहेत.
मतदान केंद्र ठिकाणे - १९१
एकूण मतदान केंद्रे - ११४८
तात्पुरत्या मंडपातील मतदान केंद्रे - १८०

# एफ. जी. नाईक कॉलेजमध्ये भूगोल दिन उत्साहात साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

येथील एफ. जी. नाईक कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स(आयटी), कॉमर्स येथे १३ जानेवारी रोजी भूगोल दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रा. डॉ. दत्तात्रय घोडके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. हा उपक्रम भूगोल विषयाच्या प्रा. डॉ. कविता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

स्पर्धेचा विषय पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकास असा असून प्रथम वर्ष द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे पर्यावरण संरक्षण, हवामान बदलाचे परिणाम, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच शाश्वत विकासाची गरज प्रभावीपणे मांडली.

मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांनी भूगोल विषयाचे दैनंदिन जीवनातील व सामाजिक विकासातील महत्त्व स्पष्ट केले. भूगोल हा केवळ अभ्यासाचा विषय नसून मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन शिकवणारा शास्त्र आहे. आजच्या काळात पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व सर्जनशीलतेचे त्यांनी विशेष कौतुक केले.

सदर कार्यक्रमात प्रथम वर्षीय कला शाखा मधुरा पांडुरंग पाटील यांचा पहिला व राधिका लक्ष्मण चौगुले यांचा द्वितीय क्रमांक आला रेश्मा पांडुरंग हटकर हिचा तिसरा तृतीय वर्ष वाणिज्य शाखा तसेच उत्तेजनार्थ रूपाली सहदेव केसर तृतीय वर्ष कला शाखा आणि मैथिली गुरुनाथ अहिर प्रथम वर्ष कला शाखा यांचे क्रमांक आले.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त कोकण भवनात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

**नवी मुंबई, : रामप्रहर वृत्त**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन कोकण महसूल अपर आयुक्त वैशाली इंदाणी-उंटवाल यांच्या हस्ते आज करण्यात आले.

कोकण विभागीय भाषा संचालनालय, विभागीय आयुक्त कार्यालय, विभागीय माहिती कार्यालय आणि बृहन्मुंबई राज्य कर्मचारी संघटना, कोकण भवन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी तहसिलदार (सामान्य प्रशासन) गजानन धुमाळ, तहासिलदार (महसूल) माधुरी डोंगरे, कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक संजिवनी जाधव, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे



तसेच, कोकण भवनातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजभाषा मराठीचा दैनंदिन व्यवहारात मोठया प्रमाणात व जास्तीत जास्त वापर व्हावा, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर १४ जानेवारी ते २८ जानेवारी हा कालावधी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात येत आहे. ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी आणि कथाकथन, माहितीपट व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, राज्यातील विविध महाविद्यालये, सामाजिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी संस्कृती मंडळ तथा राज्य मराठी विकास संस्था यांनी राज्यातील पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, मुंबई आणि कोकणातील रत्नागिरी याठिकाणी असलेल्या साहित्य संस्थांची मदत घेऊन हा पंधरवडा यशस्वी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कोकण भवनात मांडण्यात आलेले हे पुस्तक प्रदर्शन याच उपक्रमाचा भाग असून या प्रदर्शनाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० अशी असणार आहे.

पान १ वरुन

## उरण उपनगराध्यक्षपदी भाजपच्या रवी भोईर यांची बिनविरोध निवड



या मिरवणुकीत आमदार महेश बालदी व नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष रवी भोईर यांच्यासह गट नेता जयविन कोळी, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, नगरसेविक सायली म्हात्रे, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, निशा म्हात्रे, उरण तालुका मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, स्नेहल कासारे, आशा शेलार, प्रीतम म्हात्रे,, उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, जान्हवी पंडित, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, खोपटे माजी सरपंच विशाखा ठाकूर, सुगंधा कोळी, कैलास भोईर, हितेश शाह, मनन पटेल, मकरंद पोतदार, संतोष ओटवकर, सुशांत पाटील, प्रशांत ठाकूर, विशाल पाटेकर, रोहन भोईर, प्रीतम पाटील, योगेश वैंवडे, पुरुशोताम सेवक, अभिषेक जैन, राजेश पाटील, निलेश कदम, दिनेश ठक्कर कुणाल शिसोदिया, हस्तिमल मेहता, देवा घरत, सूरज ठवले, समीर कुथे, सतेज पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष रवी भोईर यांनी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची भेट घेतली. या वेळी कोळी यांनी भोईर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, उपाध्यक्ष सुनील घरत, ओबीसी मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष राजेश भगत आदी उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्यावतीने प्रवाशांच्या सोयीसाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे 'रिलॅक्स झोन'

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेला भाडे-व्यतिरिक्त अवेतीरित ( नॉन-फेअर रेव्हेन्यू ) उत्पन्नांतर्गत नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्याचा मान लाभलेला असल्याने, प्रवाशांना अधिक चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध होत आहेत तसेच महसुलातही वाढ होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे सुरू करण्यात आलेला रिलॅक्स झोन हा या उपक्रमाचा नवीन भाग आहे.



प्रवाशांच्या सोयीसुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे अत्याधुनिक 'रिलॅक्स झोन' सुरू केला आहे.क्विक रेस्टद्वारे व्यवस्थापित ही नवी सुविधा थकलेल्या प्रवाशांना ताजेतवाने अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आली असून, यात संपूर्ण शरीरासाठी मसाज खुर्च्या उपलब्ध आहेत, ज्या प्रवासातील थकवा, स्नायूंचा ताण आणि तणाव कमी करण्यास मदत करतात. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील रिलॅक्स झोनमध्ये अत्याधुनिक मसाज तंत्रज्ञान तसेच स्वच्छतायुक्त आसन व्यवस्था असून, त्यामुळे सर्व प्रवाशांना आरामदायी व सुरक्षित अनुभव मिळतो. ही सुविधा परवडणाऱ्या दरात जलद मसाज सत्रे उपलब्ध करून देते, ज्याची सुरुवात केवळ रु.९९ पासून होत असून, प्रवासाआधी किंवा प्रवासानंतर प्रवाशांसाठी आराम मिळविण्याचा हा एक पर्याय आहे.

रिलॅक्स झोन मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानासह संपूर्ण शरीरासाठी मसाज खुर्च्या असुन आरामदायी आसन व्यवस्था करण्यात आली आहे.येथे आरोग्यदायी व स्वच्छतायुक्त वातावरण राहाणारे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील रिलॅक्स झोन हा मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचा आणखी एक उपक्रम असून, स्थानकावरील सुविधा उन्नत करण्यासाठी आणि प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय रेल्वेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांशी तो सुसंगत आहे.

# एनएमएमटी बससेवेबाबत जाहीर आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मतदान दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी घोषित केलेली आहे. सदर निवडणूकामी परिवहन उपक्रमाकडून बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. यास्तव दि.१४ जानेवारी २०२६ सकाळी व दि.१५ जानेवारी२०२६ रोजीचे दुपारी बस संचलन विस्कळीत होण्याची शक्यता असून काही बसमार्गावरील प्रवाशी बससेवा बंद करण्यात येणार आहे.तरी तात्पुरत्या स्वरूपात प्रवाशी जनतेस होणाऱ्या गैरसोयीबद्दल नमुंमपा परिवहन उपक्रम दिलगीर आहे. प्रवाशी जनतेने सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## दुखवटा

### भरत केदारी



**मोहोपाडा :** सावळे गावचे माजी सरपंच संजय केदारी यांचे काका व माजी सरपंच लक्ष्मण केदारी यांचे भाऊ भरत माया केदारी यांचे निधन झाले.मृत्युसमयी ते ६९ वर्षांचे होते..त्यांच्या पश्चात मुलगा प्रितम केदारी, प्रफुल केदारी ,दोन विवाहित कन्या ,जावई व बहिणी पुतणे ,नातू नाती व मोठा असा केदारी परिवार आहे.

# पीरवाडी समुद्र किनाऱ्यावरील संरक्षक कठडा ढासळला

## पर्यटकांच्या जिवाला धोका



**उरण : प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या पीरवाडी समुद्रकिनाऱ्यावरील बीचवर संरक्षण कठड्याच्या मोठमोठ्या दगडांचा खच पडल्याने पर्यटकांना किनाऱ्यावर जाण्यास अडचण होत आहे. तर बंधाऱ्याची दगड वाहून जात असल्याने बंधाऱ्याला भगदाड पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे किनाऱ्यावर येणाऱ्या शेकडो पर्यटकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

मुंबईपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर असलेल्या उरणचा पीरवाडी समुद्रकिनारा हा पर्यटकांचा आकर्षण बनला आहे. त्यातच, उरण तालुक्याला लाभलेला पीरवाडी समुद्रकिनारा हा पर्यटकांसाठी एकमेव किनारा आहे. यामुळे, विकेंड आणि सटीच्या दिवशी अनेक पर्यटक हे या किनाऱ्यावर गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, उरणच्या या समुद्रकिनाऱ्याची धूप होत असल्याने गेल्या काही वर्षांपूर्वी नागाव ते दांडा समुद्रकिनाऱ्यावर सुमारे १५ फूट उंचीचा दगडी बंधारा टाकण्यात आला आहे. यासाठी, कोट्यवधी रुपये खर्चून लहान-मोठ्या आकाराची दगड एकमेकांवर रचून हा बंधारा बांधण्यात आला आहे, परंतु गेल्या काही दिवसांपासून या बंधाऱ्यावरील दगड ही खाली वाळूमध्ये वाहून आल्याने या किनाऱ्यावर फिरायला येणाऱ्या पर्यटकांना अडचण निर्माण झाली आहे. तर, किनाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला खडक असल्याने त्याठिकाणी खाली उतरुन फिरणे शक्य नसल्याचे पर्यटकांनी म्हटले आहे.

पीरवाडीच्या या समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या जेट्टीजवळ ही दगडं मोठ्या प्रमाणात असल्याने लहानग्याना आणि ज्येष्ठांना समुद्रावर जाण्यासाठी कसरत करावी लागत असल्याचे पर्यटक निशांत ठाकूर यांनी म्हटले आहे. तर, किनाऱ्यावरील सुमारे १५० ते दोनशे फुटांच्या अंतरात वाळूवर आलेल्या दगडांमुळे लहानग्या चिमुरड्यांन वाळूत खेळण्याचा आनंद घेता येत नसल्याचे सांगण्यात आले आहे. तर, किनाऱ्यापासून खाली वाळूत जाण्यासाठी या दगडांमधून मार्ग काढतान कसरत करावी लागत असून अपघात होण्याची भिती पर्यटक ज्योती म्हात्रे यांनी व्यक्त करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील पर्यटकांना पीरवाडी समुद्रकिनाऱ्यावर फिरण्याचा आनंद घेता येण्यासाठी बंधाऱ्याची डागडुजी करून किनाऱ्याचे सौंदर्य टिकविण्याची गरज असल्याचे पर्यटक जिग्नेश तांडेल याने म्हटले आहे.

## तोतया पोलिसांनी केली डॉक्टरची लूट

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात एका ५६ वर्षीय डॉक्टरला पोलीस असल्याची भीती दाखवून चौकडीने तब्बल १३ लाख २५ हजारांची लूट केली. याबाबत सोमवारी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. सायंकाळी सव्वापाच वाजता सेक्टर २० येथील कॅनरा बँकेसमोरील रस्त्यावर ही घटना घडली.

डॉ. मनीष शिवाजी शिंदे (मूळ रा. सांगली) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चार अनोळखी व्यक्तींनी भरलेली मोटार त्यांच्यासमोर आली. त्या मोटारीतून बाहेर पडलेल्या व्यक्तींकडे काट्या आणि डोक्यात पोलिसांची टोपी होती. त्यामुळे डॉक्टर शिंदे यांना हे पोलीस असल्याचा समज झाला. संशयित चार आरोपींनी त्यांना भीती दाखवून त्यांची जबरी लूट केल्याने खारघरमध्ये व्यावसायिकांमध्ये घबराट पसरली आहे. याप्रकरणी खारघर पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३१८(४), २०४व ३ (५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# पनवेल मनपा हद्दीमध्ये पोलिसांचा रूट मार्च

## पालिका निवडणूकीच्या अनुषंगाने विविध उपक्रम



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष मतदान आणि १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. करीता कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रूट मार्च पोलीस ठाणे येथे सुरू होऊन स्वामी नित्यानंद मार्गावरून पनवेल महानगरपालिका मुख्यालय-मौलाना अब्दुल कलाम आझाद चौक- एमजी रोड- मिरची गल्ली नाका-टपाल नाका -कर्नाळा भाजी मार्केट सर्कल- छत्रपती शिवाजी महाराज चौक- आदर्श हॉटेल चौक-लाईन आळी- दांडेकर रुग्णालयासमोरून गावदेवी पाडा मार्गे -व्हिके हायस्कूल येथे समाप्त झाला. रूटमार्च नंतर व्ही.के.हायस्कूल येथे निवडणूक बंदोबस्त करीता नेमलेल्या अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांना पवन चांडक, निवडणूक निर्णय अधिकारी, प्रभाग क्र.१७,१८,१९,२०, व भाऊसाहेब ढोले, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, पनवेल, वपोनि नितीन ठाकरे यांनी मतदान दिवशीच्या बंदोबस्ताचे तसेच मतमोजणी प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना दिल्या.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तिकांचे वाटपदेखील बंदोबस्तावरील सर्व अधिकारी,अंमलदार व होमगार्ड यांना करण्यात आले आहे. बंदोबस्ताच्या अनुषंगाने उपस्थित अधिकारी, अंमलदार, होमगार्ड यांच्या सूचना समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

रूटमार्च व मार्गदर्शनानंतर बंदोबस्तावरील आठ अधिकारी, ११० पोलीस अंमलदार व ८० होमगार्ड हजर होते. त्यांना आपापल्या बंदोबस्ताचे ठिकाण व्यवस्थितरित्या समजावून सांगण्यात आले आहे.

# उलवे नोड येथे लोकनेते दि.बा. पाटील यांची जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकरी कष्टकरी बहुजन समाजाचे कैवारी तसेच पनवेल उरण येथील आगरी कोळी कराडी समाजाचे आराध्य दैवत माजी खासदार लोकनेते दिबा पाटील साहेब यांची शंभरावी जयंती सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे नोड येथे झाली.

या कार्यक्रमासाठी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभले दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले तर दिपप्रज्वलन विस्तार अधिकारी केणी साहेब विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांच्या हस्ते झाले.

शेतकऱ्यांना संपादित केलेल्या जमिनीसाठी १२.५% ची योजना विमानतळ प्रकल्पग्रस्तांना साडेबावीस टक्के योजना हे केवळ पाटील साहेबांच्या १९८४ च्या जासई हुतात्मा लढ्यामुळे शक्य झाले या लढ्यात दि बाना लाठीमार सहन करावा लागला तुरुंगात जावं लागले पण तरीही हा लढा त्यांनी यशस्वी केला. रयत शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रायगड जिल्ह्यात रोवण्याचे काम पाटील साहेबांनी केले आज संपूर्ण रायगड जिल्हा सुशिक्षित झालेला आहे. त्याचे सारे श्रेय दीबा पाटील साहेबांना आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही घडलो त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे मौलिक मार्गदर्शन पर विचार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केले.

शेवटी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवेचे मुख्याध्यापक दीपक भरणुके यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी मराठी माध्यमाच्या सर्व सेवकवर्गांनी मोलाचे सहकार्य केले.

## फणसवाडी गावात बालविवाह रोखला

**पनवेल :** तालुका पोलिसांच्या तत्परतेमुळे बालविवाह रोखण्यास यश आले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील फणस वाडी या गावात वाघमारे कुटुंबीयात बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वपोनी गजानन घाडगे यांच्या आदेशान्वये स पो नी कुदळे, पोलीस उपनिरीक्षक फड व पीसी चालक प्रदीप पाटील असे फणस वाडी याठिकाणी जावून ग्रामपंचायतचे ग्राम पंचायत अधिकारी सदाशिव लवते, पोलीस पाटील प्रविण पाटील, सरपंच संजय घरत व आशा सेविका यांच्या सह वाघमारे कुटुंबीयाना व गावातील ५० ते ६० स्त्री पुरुष यांची बैठक घेवून त्याना बालविवाह बाबत माहिती देऊन त्यांचे बालविवाह रोखण्याबाबत समुपदेशन केले आहे.

# उलवे रहिवासी संघटनेतर्फे मकरसंक्रांती महोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे रहिवासी संघटनेच्या वतीने मकरसंक्रांती महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. मकर संक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त उलवे परिसरातील सर्व नागरिकांना शुभेच्छा देत सामाजिक सलोखा आणि आपुलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

या शुभप्रसंगी संघटनेतर्फे सर्व उलवे वासीयांना हार्दिक शुभेच्छा व धन्यवाद व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास उलवे रहिवासी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी संघटनेचे अध्यक्ष अवधेश भाई महतो, उदय पांडे, अवनीश सिंह, मनोज यादव, भारत गुप्ता, विलास चांसल, चुन्नी भाई, मीना भावसार यांच्यासह समस्त उलवे रहिवाशी उपस्थित होते.

मकरसंक्रांतीसारखा सण समाजात एकोपा, सौहार्द आणि सकारात्मकतेचा संदेश देतो. या भावनेतूनच हा महोत्सव साजरा करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमामुळे परिसरात आनंदाचे व उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.




# एमएनएम विद्यालयात तुकाराम नारायण घरत यांचे पुण्यस्मरण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात स्वर्गीय तुकाराम नारायण घरत यांचे अकरावे पुण्यस्मरण निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कामगार नेते महेंद्र शेठ घरत यांनी स्वर्गीय तुकाराम नारायण घरत यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

या वेळी शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, योगिता भगत, विजय घरत, अनंता ठाकूर, जयवंत देशमुख, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, श्रीकांत घरत, मीनाक्षी पाटील तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर, छत्रपती शिवाजी विद्यालय गव्हाण मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, प्राध्यापक राजेंद्र चौधरी, शाळेच्या माध्यमिक उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वर्गीय तुकाराम नारायण घरत त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन केले.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे धडे

## तब्बल ७०० विद्यार्थ्यांनी घेतले स्वरक्षणाचे प्रशिक्षण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा फुले आर्ट सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय पनवेल व रायगड तायकवोंडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास ७०० विद्यार्थ्यांना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन एमपीएएससी कॉलेज पनवेलचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य ठाकूर आपल्या भाषणात म्हणाले की, सुभाष पाटील हे आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी असून ते स्वतः कॉलेजसाठी दरवर्षी आपल्या विद्यार्थिनींना मोफत प्रशिक्षण देतात त्यांचे खूप मोठे योगदान आहे. आपल्या कॉलेजच्या विद्यार्थिनींना तायक्वॉन्डो या खेळामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिलेली आहेत खेलो इंडिया स्पर्धेसाठी आपल्या कॉलेजची विद्यार्थिनी निर्मिती दत्ता हिची निवड झाली होती. कॉलेजच्या विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक शक्तीला चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना स्वयंसेरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींची सेड काढण्याचे प्रकार घडतात अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ही वाढवतात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील तेव्हा अशा प्रकारच्या घटनाही वारंवार घडतात महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत.

विशेषतः कॉलेजच्या विद्यार्थिनींचे स्वयंरक्षणासाठी आत्मबल वाढले पाहिजे त्याचबरोबर मुलींनी गुन्हेगारी विरोधात लढण्यासाठी सक्षम व्हावे या उद्देशाने महात्मा फुले कॉलेज अंतर्गत असे उपक्रम राबविण्यात येतात हे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय पंच सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे सहकारी अनिल म्हात्रे, तेजस माळी, अक्षता भगत, निर्मिती दत्ता पल्लवी म्हात्रे श्रेया लालु द्रुवल सालियान समर्थ बराटे आणि सनी पासवान इत्यादींचे मार्गदर्शन लाभले विशेष म्हणजे या सेमिनार साठी महाविद्यालयच्या सर्व शिक्षिका उपस्थित होत्या आणि त्यांनी ही प्रशिक्षण घेतले, असे सुभाष पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## संपादकीय

# विकासावरच दृढ विश्वास

महाराष्ट्राची जनता सुजाण आहे. राज्याचे आणि आपल्या शहराचे हित कोणाच्या हाती सुरक्षित राहील याची सामान्य मतदाराला पूर्ण जाणीव आहे. विकासाच्या वाटेवरचा त्यांचा विश्वास दृढ असल्यानेच ते खोट्या भावनिक प्रचाराला बळी पडणार नाहीत याची खात्री वाटते.

**आपल्या संसदीय लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकांनी लोकांसाठी चालवलेले कल्याणकारी राज्य अशी एक लोकमान्य व्याख्या लोकशाही व्यवस्थेची केली जाते. यातील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे आणि त्याला एक पवित्र मूल्य देखील आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हे उत्तम नेतृत्वाचे पाळणाघरच मानले जाते. स्थानिक निवडणुकांमधून भविष्यातील राष्ट्रीय नेते उदयाला येतात. तसेच आपल्या परिसराची जबाबदारी स्वयंपूर्णतेने स्वत:च पार पाडण्याचे स्वातंत्र्य जनतेला मिळते. त्याअर्थी या निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव मानायला हवा. म्हणूनच प्रत्येक मतदाराने या उत्सवात सहभागी होऊन आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे आणि पनवेलमधील मतदार आपले हे कर्तव्य अवश्य पार पाडतील याची खात्री आहे. राज्यातील महायुती सरकारच्या राजवटीत विकास सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट दिसतो आहे. म्हणूनच जनतेला भारतीय जनता पक्ष-शिवसेना महायुतीबद्दल अपरंपार विश्वास वाटतो. ही वस्तुस्थिती विरोधकांना जरी दिसत नसली तरी जनतेच्या दरबारात एकदा नव्हे, दोनदा नव्हे तर तीनदा कौल भाजपलाच मिळाला हे नाकारता येणार नाही. आता चौथ्या वेळी २९ महापालिकांच्या निवडणुकांमध्ये निकाल काय लागणार याची चर्चा करण्याचेही कारण नाही. महाराष्ट्राची जनता सुजाण आहे. राज्याचे आणि आपल्या शहराचे हित कोणाच्या हाती सुरक्षित राहील याची सामान्य मतदाराला पूर्ण जाणीव आहे. प्रचाराच्या काळात ठाकरे बंधूंनी कितीही रान उठवण्याचा प्रयत्न केला असला तरी मतदारांचा महायुतीवरील विश्वास डळमळीत होणे कदापि शक्य नाही. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या खोट्या प्रचाराला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांच्याकडे मतदारांसमोर ठेवण्यासारखे काम नसते, तेच भावनिक मुद्यांचा आधार घेतात हे जनताही नीट जाणून आहे. काही राजकीय पंडितांच्या मते २९ पैकी एकही महापालिका विरोधकांच्या हाती लागणार नाही. मनोमिलनाचा डंका कितीही पिटला गेला असला तरी मुंबईत यावेळी मनाजोगताच महापौर बसेल यात काही शंका नाही. अर्थात राज्यात सारे काही आलबेल दिसत असले तरी मतदारांनी मात्र गाफील राहू नये. कोट्यवधींचा खर्च निवडणूक यंत्रणेवर होत असतो. मतदान हा नागरिकाला संविधानाने दिलेला अधिकार आहे. तो न बजावता निव्वळ समाजमाध्यमांवर उलटसुलट मतांतरे व्यक्त केल्याने लोकशाही सशक्त होत नसते. दुर्दैवाने अशा ट्रोलधाडींच्या आड विरोधक आपली राजकीय पोळी भाजून घेताना दिसतात. व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य नागरिकाला असतेच, परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. अशा बेजबाबदार मतांतरांमधूनच अफवा, फेक नॅरेटिव्ह आणि अपप्रचाराचा ओघ वाहू लागतो. यामुळे वातावरण तेवढे गढूळ होते. संभ्रमावस्थेत मतदार अडकला की योग्य उमेदवार निवडणे कठीण होऊन बसते. ती कठीण परीक्षा मतदारांना आज द्यायची आहे. आणि यापूर्वीप्रमाणेच ते खोट्या प्रचाराने किंचितही प्रभावित न होता विकासाची वाटच निवडतील याची खात्री आहे. भावनिक आवाहने करून मतदारांना भुलवण्याचा प्रयत्न कितीही झाला असला तरी त्यातील फोलपणा ओळखून असलेले मतदार आपल्या शहराचा विकास कुणाच्या हातांमध्ये सुरक्षित आहे यालाच महत्त्व देऊन मतदान करतील हे निश्चित.**

# पोलादपूर तालुक्यात चाकरमानी ठरणार निर्णायक मतदार

**खबरबात**
शैलेश पालकर




पोलादपूर तालुक्याला चाकरमान्यांच्या मनीऑर्डरचा तालुका अशी ओळख आहे.एके काळी नोकरीनिमित्त शहरांकडे जाणाऱ्या चाकरमान्यांकडून आईवडील भावंडांना काही रक्कम दरमहा घरखर्च आणि शेतीकामासाठी पाठविण्याची प्रथा असल्याने झाली होती.

त्याकाळी या चाकरमान्यांची नावे पोलादपूर तालुक्यातील गावाच्या मतदार यादीमध्ये असूनही फारच कमी हौशी मतदार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि विधानसभा-लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करून जात असत. अत्यल्प सेवानिवृत्त अथवा वयोमान व अन्य क्षमतारहित मतदारांना मुंबईतील काही वॉर्डातील उमेदवारांकडून बोलावणे आल्याने ते देखील मतदानासाठी जात असत. आता ही संख्या हे चाकरमानी पंचायत समिती आणि जिल्हापरिषदच नव्हे तर ग्रामपंचायत, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीमध्येही निर्णायक आणि प्रभावशाली मतदार ठरण्याइतपत वाढली आहे.

एकाच गावातील दोन प्रभागांत दुबार नांवे असल्यास ती कमी करण्यासाठी मतदाराचे नांव तारांकित करण्यात आले असते. मात्र, पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील मतदार मुंबई, नवी मुंबई, पनवेल, पुणे, पिंपरी चिंचवड, महाबळेश्वर, महाड, बडोदा, अहमदाबाद, सुरत अशा विविध शहरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरीत झाले असताना गावाकडे धावती भेट देऊन पोलादपूरमध्ये फ्लॅट घेऊन राहतात असल्याचे दिसून आले आहे. त्यांचे रोजगाराच्या शहरामध्ये पोलादपूरमध्ये आणि गावामध्येदेखील मतदार यादीत नांव दिसून येते. ने-आण व जेवणनाश्ता करण्याचा खर्च देऊन शहरातील मतदार जिल्हा परिषद आणि पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी हे चाकरमानी मतदार आणण्याची प्रथा सुरू झाली आहे. स्थानिक पातळीवर पाच वर्षे विकासकामे करण्यासाठी गावोगावीचे कार्यकर्ते महिना दोन पाच हजार देऊन पोसायचे आणि शहरातील मतदारांना मतामागे ५-१० हजार देऊन गावाकडे आणायचे, असा प्रघात पडला आहे. शहरातील मतदान झाल्यानंतर गावाकडे मतदान करायला जायचे आणि मतदान करून पुन्हा शहराकडे परत येण्याचे तंत्र या मतदारांनाही अवगत झाल्याने मतदारांचा जथ्था गावाकडे नेऊन आणण्याचा ठेका देखील शहरातील मतदारांचे प्रमुख कार्यकर्ते घेऊ लागले आहेत. विधानसभा आणि लोकसभा मतदान शहराकडे वेगळया तारखेला आणि गावाकडे वेगळया तारखेला असल्याचे निवडणुक कार्यक्रमात दिसून आल्यास हे मतदारांचे ठेकेदार सर्व पक्षियांकडे चर्चा करून लागले आहेत. यामुळे स्थानिक मतदारांच्या तुलनेत दुबार तिबार मतदारच निर्णायक ठरत असल्याचे दिसून येत आहे.

रायगड जिल्हा परिषद आणि पोलादपूर पंचायत समितीच्या रखडलेल्या पंचवार्षिक निवडणुका तातडीने घेण्यासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार तहसील कार्यालय मार्फत वेगवान हालचाली सुरू झाले असून जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणाच्या आरक्षण प्रक्रियेनंतर दुबार आणि तिबार मतदारांचा मुद्दा राज्य निवडणूक आयोगासमोर आणल्यानंतर पोलादपूर तहसील कार्यालयाने ६९० दुबार मतदारांची नावे निश्चित केली असून राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दुबार मतदारांकडून परिशिष्ट १ नुसार मतदानापूर्वीच मतदान केंद्र आणि यादी क्रमांकानुसार मतदान करण्याची भूमिका लेखी स्वरुपात घेण्यात येण्याचा कार्यक्रम संबंधित गावसजेतील तलाठीमार्फत सुरू झाली असली तरी गावाकडील मतदार यादीतील दुबार मतदार हे निवडणुक आयोगाने मतदान ओळखपत्राला आधारकार्ड लिंक करण्याची भूमिका न घेतल्याने शहराकडून पोलादपूर तालुक्यातील गावाकडे आणि गावाकडून नोकरीधंद्याच्या शहराकडे ये-जा करणाऱ्या मतदारांची मतदार यादीतील नांवे दुबार तिबार की अनेकबार आली आहेत, याचा शोध घेतला जाऊ शकलेला नाही.

पोलादपूर तालुक्यातील माटवण येथे ११ दुबार मतदार, सवाद-१ मध्ये ८ दुबार मतदार, सवाद-२ मध्ये ६ दुबार मतदार, धारवली येथे ९ दुबार मतदार, आंग्रे कोंड येथे ४ दुबार मतदार, कालवली येथे नऊ दुबार मतदार, तुर्भे बुद्रुक येथे १० दुबार मतदार, तुर्भे खुर्द येथे ३६ दुबार मतदार, तुर्भे खोंडा येथे ५ दुबार मतदार, वझरवाडी येथे १५ दुबार मतदार, कापडे खुर्द येथे १० दुबार मतदार, चांभारगणी बुद्रुक येथे ४ दुबार मतदार, निवे येथे २ दुबार मतदार, किनेश्वर येथे १२ दुबार मतदार, पैठण येथे ९ दुबार मतदार, कोतवाल खुर्द येथे ११ दुबार मतदार, कोतवाल बुद्रुक येथे २० दुबार मतदार, ओंबळी येथे २३ दुबार मतदार, गोळेगणी येथे ८ दुबार मतदार, परसुले येथे १७ दुबार मतदार, कुडपण बुद्रुक येथे ११ दुबार मतदार, गोवेले येथे १५ दुबार मतदार, चरई येथे ७ दुबार मतदार, रानवडी बुद्रुक येथे १० दुबार मतदार, बोरावळे येथे १० दुबार मतदार, बोरावळे गुडेकर कोंड येथे १४ दुबार मतदार, घागरकोंड येथे ८ दुबार मतदार, साखर येथे २४ दुबार मतदार, चोळई येथे ८ दुबार मतदार, काटेतळी येथे २७ दुबार मतदार, सडवली येथे २१दुबार मतदार, धामणदेवी येथे ४ दुबार मतदार, मोरगिरी येथे १८ दुबार मतदार, मोरगिरी फौजदारवाडी येथे १२ दुबार मतदार, देवपूर येथे ५ दुबार मतदार, कापडे बुद्रुक-१ येथे ४२ दुबार मतदार, कापडे बुद्रुक-२ येथे १९ दुबार मतदार, महाळुंगे येथे १५ दुबार मतदार, भोगाव खुर्द येथे ३२ दुबार मतदार, कोंढवी येथे ११ दुबार मतदार, वडघर बुद्रुक येथे ८ दुबार मतदार, कामथे येथे ५ दुबार मतदार, सडे येथे ७ दुबार मतदार, मोरसडे येथे २८ दुबार मतदार, आडावळे बुद्रुक येथे २० दुबार मतदार, बोरघर येथे १७ दुबार मतदार, उमरठ येथे १५ दुबार मतदार, ढवळे येथे २२ दुबार मतदार, करंजे येथे १० दुबार मतदार, देवळे येथे १९ दुबार मतदार, नाणेघोळ येथे ८ दुबार मतदार, वाकण-१ येथे १५ दुबार मतदार, वाकण-२ येथे १४ दुबार मतदार, केवनाळे येथे ४ दुबार मतदार, रानकडसरी येथे १ दुबार मतदार, दाभिळ येथे ११ दुबार मतदार, दिवील येथे १२ दुबार मतदार, पार्ले येथे १४ दुबार मतदार, लोहारे-१ मध्ये १५ दुबार मतदार, लोहारे -२ मध्ये १४ दुबार मतदार, रानबाजीरे येथे ८ दुबार मतदार, महालगूर येथे १८ दुबार मतदार, पळचिल येथे २९ दुबार मतदार असल्याची नोंद प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या मतदार यादी मध्ये ८९० दुबार मतदार असल्याचे आढळून आले असले तरी पोलादपूर नगरपंचायतीच्या विविध प्रभागांमध्ये आणि नोकरीनिमित्त वास्तव्यास असलेल्या शहरांमध्ये देखील मतदार दिसून येणार आहेत. मतदान ओळखपत्र हे आधार कार्डला लिंक केले गेल्यास मतदार कोण कोणत्या ठिकाणी आणि किती वेळा मतदान करीत आहे, याचा अंदाज राज्य निवडणूक आयोगाला येऊ शकणार आहे. दरम्यान, संभाव्य प्रारूप यादीतील मतदार संख्या १९ हजार ४३० पुरुष आणि १९ हजार ६९३ महिला अशी एकूण ३९ हजार १२७ अशी असून जुलै २०२५ मधील मतदार संख्या अंतिम मानण्यात येणार असली तरी सद्यस्थितीत १९ हजार ४८५ पुरुष आणि १९ हजार ७५७ महिला अशी एकूण ३९ हजार २४२ असल्याचे ३ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीत दिसून येत आहेत. यामध्ये फ्लोटींग वोटर्सना दुबार तिबार अनेकबार धरण्यात आलेले दिसून येत नाही. परिणामी, हा मतदार स्थानिक कार्याकर्तऱ्यांपेक्षा अधिक किंमती आणि खर्चिक असला तरी तोच निर्णायक ठरत आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# चॅटजीपीटी मेडिकल रिपोर्ट समजावून सांगेल

नवी दिल्लीसॅम ऑल्टमनच्या ओपन-एआय कंपनीने आरोग्याशी संबंधित माहितीसाठी 'चॅटजीपीटी हेल्थ' हे नवीन फीचर लॉन्च केले आहे. हे फीचर वापरकर्त्यांना त्यांचे वैद्यकीय रेकॉर्ड्स आणि पल हेल्थ व माय-फिटनेस-पाल सारख्या फिटनेस ॲप्सना चॅटजीपीटीशी जोडण्याची सुविधा देते.




कंपनीचा दावा आहे की, याच्या मदतीने लोक आपले आजार, लॅब टेस्ट रिपोर्ट्स आणि फिटनेस रूटीन अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतील. सध्या या फीचरसाठी वेटलिस्ट सुरू करण्यात आली आहे.

ओपन-एआयने एका ब्लॉग पोस्टमध्ये सांगितले की, दर आठवड्याला जगभरातील सुमारे २३ कोटी लोक चॅटजीपीटीला आरोग्य आणि वेलनेसशी संबंधित प्रश्न विचारतात. या वाढत्या लोकप्रियतेमुळे कंपनीने डॉक्टरांसोबत मिळून 'चॅटजीपीटी हेल्थ' डिझाइन केले आहे.याचा उद्देश लोकांना त्यांच्या आरोग्याबद्दल अधिक जागरूक करणे आणि डॉक्टरांसोबत अपॉइंटमेंटपूर्वी त्यांना चांगल्या प्रकारे तयार करणे हा आहे.

चॅटजीपीटी हेल्थचे सर्वात मोठे वैशिष्ट्य त्याचे एकत्रीकरण आहे. युजर्स आपला मेडिकल डेटा आणि वेलनेस ॲप्स याला सुरक्षितपणे जोडू शकतील.चाचणी अहवाल समजून घेणे: हे तुम्हाला तुमच्या अलीकडील लॅब चाचणीचे निकाल समजून घेण्यास मदत करेल.

डेटा सुरक्षिततेवर भर: एआय मॉडेलच्या प्रशिक्षणात डेटा वापरला जाणार नाही.वैद्यकीय डेटाची संवेदनशीलता लक्षात घेता, ओपन-एआयने सुरक्षिततेसाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. कंपनीचे म्हणणे आहे की:हेल्थ सेक्शनमध्ये होणारे संभाषण पूर्णपणे एन्क्रिप्टेड आणि 'कम्पार्टमेंटलाइज्ड' (एकदम वेगळे) असेल.या सेक्शनमधील डेटाचा वापर एआय मॉडेल्सना प्रशिक्षित करण्यासाठी केला जाणार नाही.हेल्थ चॅटची मेमरी सामान्य चॅटपेक्षा वेगळी राहील आणि वापरकर्ते जेव्हा हवे तेव्हा ती डिलीट करू शकतील.चॅटजीपीटी हेल्थ वापरण्यासाठी वापरकर्त्यांना सध्या वेटलिस्टसाठी साइन-अप करावे लागेल. ॲक्सेस मिळाल्यानंतर, ते चॅटजीपीटीच्या साइडबारमध्ये 'हेल्थ' या नावाने दिसेल सध्या अमेरिकेतील वापरकर्त्यांसाठी सुरू केली आहे.

# भारतीय कुस्तीगीर खाशाबा जाधव



**निमित्त**

खाशाबा जाधव हे एक ऑलिम्पिक पदक विजेते भारतीय कुस्ती खेळाडू होते. इ. स. १९५२मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत खाशाबा यांनी फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात कांस्यपदक जिंकले. त्यांनी जिंकलेले हे पदक तेव्हा ऑलिम्पिक स्पर्धेतील स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक पदक होते. या पदकामुळे भारताला एक नवीन उमेद मिळाली. त्यांच्याबद्दल आपण अधिक जाणून घेऊया.

खाशाबा जाधव यांचा जन्म १५ जानेवारी १९२५ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात असलेली गोलेश्वर गावात झाला. खाशाबा हे दादासाहेब जाधव यांचे सर्वांत धाकटे अपत्य होते. खाशाबा यांना चार भावंडे होती. त्यांचे वडील दादासाहेब हे ख्यातनाम पैलवान होते. त्यांच्या आईचे नाव पुतळीबाई होते.

खाशाबा यांचे आईवडील हे शेती करत. त्यांचे वडील हेही कुस्ती खेळायचे सोबतच ते तरुणांना कुस्तीचे शिक्षणदेखील द्यायचे. त्यामुळे खाशाबा यांच्यात कुस्ती ही जन्मापासून होती असे म्हणता येईल.

खाशाबा जाधव यांनी १९४०-१९४७ दरम्यान कराड तालुक्यात असणाऱ्या टिळक हायस्कूलमध्ये आपले शिक्षण घेतले. बालपणापासून दादासाहेबांनी खाशाबा यांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली होती शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खाशाबा हे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूरला गेले. या काळात त्यांना बाबुराव बाळवडे आणि बेलपुरी गुरुजी यांनी कुस्तीचे प्रशिक्षण दिले आणि मार्गदर्शन केले.

१९४८मध्ये खाशाबा यांची लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत फ्लायवेट गटासाठी कुस्तीमध्ये निवड झाली. निवड झाली तेव्हा ते खेळाडूंमध्ये सहाव्या क्रमांकावर होते. एवढ्या उच्च स्थानावर पोहचू शकणारे ते भारताचे प्रथम खेळाडू होते.


१९४८मधील ऑलिम्पिक स्पर्धेत खाशाबा जाधव जिंकू शकले नाही, पण १९५२ सलाच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांनी जोरदार सुरूवात केली. ही स्पर्धा हेलसिंकी येथे होणार होती. या स्पर्धेसाठी खाशाबा यांची बॉटमवेट म्हणजे ५७ किलो वजन गटात निवड झाली.

ऑलिम्पिक स्पर्धेस जाण्यासाठी पैसे नव्हते. अशावेळी गावातील सर्व लोकांनी आणि आणि आजूबाजूच्या लोकांनी वर्गणी गोळा करून खाशाबा यांना जाण्यासाठी पैसे जमा केले. त्यांच्या महाविद्यालयाच्या प्राचार्य बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी खाशाबा यांना जाण्यासाठी स्वतःचे घर बँकेकडे गहाण ठेवून आर्थिक मदत केली होती.

१९५२मधील हेलसिंकी येथील ऑलिम्पिक स्पर्धेत खाशाबांसोबत २४ स्पर्धक होते. खाशाबा हे सेमी फायनलपर्यंत पोहचले. खाशाबा यांनी या स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. त्यांनी जिंकलेले हे कांस्यपदक वैयक्तिक पातळीवर स्वतंत्र भारताला मिळालेले पाहिले ऑलिम्पिक पदक ठरले. त्यामुळे खाशाबांचा विजय भारतासाठी अभिमानाची गोष्ट ठरली.

सन १९५५मध्ये खाशाबा हे महाराष्ट्र पोलीस दलात सब-इन्स्पेक्टर म्हणून भरती झाले. तेव्हा होणाऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत त्यांनी अनेक कुस्त्या जिंकल्या. त्याच काळात खाशाबा जाधव हे राष्ट्रीय स्तरावर स्पोर्ट्स मार्गदर्शक म्हणून काम करू लागले. खाशाबा यांनी महाराष्ट्र पोलीस दलात २७ वर्षे काम केले आणि शेवटी ते असिस्टंट पोलीस कमिशनर या हुद्द्यावर असताना नोकरीतून निवृत्त झाले. १४ ऑगस्ट १९८४ रोजी खाशाबांचा मृत्यू झाला. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# बैठ्या कामामुळे पोटावरची वाढणारी चरबी अशी करा कमी

वजन कमी करणे, पोटावर आलेली चरबी कमी करणे हे आपल्या जीवनशैलीमुळे अनेकदा शक्य होत नाही. दिवसभर कामाचा प्रचंड येणारा ताण आणि ऑफिसमध्ये तासनतास करावे लागणारे बैठे काम यामुळे स्वतःकडे लक्ष देणे बऱ्याचजणांना जमत नाही, मात्र प्रत्येकालाच आपली कंबर मॉडेल्सप्रमाणे सडपातळ असावी असे वाटते. हे वाटणे अजिबात चुकीचे नाही. त्यासाठी आपला आहार आणि शरीराला काही सवयी असणे गरजेचे असते. जाड होण्याच्या किंवा चरबी वाढण्याच्या मुळावरच जर आपण उपाय केला तर त्याचा फायदा अधिक आणि लवकर होऊ शकतो.



यासाठी काय करायचे याबद्दल अत्यंत महत्वाच्या आणि उपयुक्त अशा तीन टिप्स आहारतज्ज्ञ नेहा सेठी यांनी दिल्या आहेत. पहिलाच सल्ला हा नेहा यांनी आपल्या आहारातील साखर हा पदार्थ पूर्णतः बंद करण्याचा दिला आहे तसेच दिल्लीच्या इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलमधील प्रमुख आहारतज्ज्ञ डॉक्टर रोहिणी रोहतगी यांनी यामागचे वैज्ञानिक कारणदेखील सांगितले आहे. त्यानुसार साखर असलेल्या खाद्यपदार्थांमध्ये किंवा पेयांमध्ये कॅलरीजचे प्रमाण अधिक असून पोषक घटक कमी असतात. त्यामुळे शरीरात ऊर्जा खर्च करण्याचे आणि साठून राहण्याच्या प्रमाणात असमतोल निर्माण होतो, असे त्यांचे म्हणणे आहे.

ओटीपोटावरील चरबी घटवण्यासाठी आपल्या आहारात दररोज सॅलेडचा समावेश करणे खूप उपयुक्त ठरू शकते. पालेभाज्या, विविध रंगांच्या भाज्या वापरून बनवलेल्या सॅलेडमध्ये कॅलरीजचे प्रमाण कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त असते. फायबरयुक्त पदार्थांचे आहारात सेवन केल्याने कमी कॅलरीज असूनदेखील आपले पोट अधिक भरते आणि भूक भागण्यास मदत होते, असे क्लिनिकल आहारतज्ज्ञ जस्मिन अन्सारी यांनी सांगितले आहे.

दिवसभरातून केवळ ४५ मिनिटे चालण्याने तुमच्या पोटावरील चरबी कमी होण्यास अत्यंत फायदा होऊन कॅलरीज जाळण्यास मदत होते. मध्यम गतीने एरोबिक व्यायाम केल्यास शरीरामध्ये साठून राहिलेल्या अतिरिक्त चरबीचा ऊर्जा म्हणून वापर होतो, मात्र या क्रियेमध्ये सातत्य असणे गरजेचे आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२६ जाहीर

## ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला मतमोजणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाने दि.१३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२६ जाहीर केला आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२६ करिता सविस्तर निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून रायगड जिल्ह्यात ५९ गट, ११८ गण असून २ हजार ३२३ मतदान केंद्रांवर गुरुवार, दि.५ फेब्रुवारीला मतदान तर शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

या निवडणुकांसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकारी व १५ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.रायगड जिल्ह्यात एकूण ५९ जिल्हा परिषद गट व ११८ पंचायत समिती गणांची तालुकानिहाय माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक : ०१ जुलै २०२५, निवडणूक सूचना प्रसिद्ध : १६ जानेवारी २०२६, नामनिर्देशन दाखल व स्विकारणे : १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६ (रविवार वगळून, वेळ ११ ते ३), नामनिर्देशन छाननी : २२ जानेवारी २०२६ (सकाळी ११ वाजता), वैध नामनिर्देशित उमेदवार यादी प्रसिद्ध करणे : २२ जानेवारी २०२६, उमेदवारी मागे घेणे : २३ जानेवारी, २४ जानेवारी व २७ जानेवारी २०२६, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप : २७ जानेवारी २०२६ (दुपारी ३.३० नंतर), मतदान दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७.३० ते सायं. ५.३०), मतमोजणी : ०७ फेब्रुवारी २०२६ (सकाळी १० पासून), निवडून आलेल्या उमेदवारांची नावे शासन राजपत्रात जाहीर करणे : १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत.

पनवेल गट संख्या ८ गट व गण संख्या १६, कर्जत गट संख्या ६ गट व गण संख्या १२, खालापूर गट संख्या ४ गट व गण संख्या ८, सुधागड गट संख्या २ गट व गण संख्या ४, पेण गट संख्या ५ गट व गण संख्या १०, उरण गट संख्या ४ गट व गण संख्या ८, अलिबाग गट संख्या ७ गट व गण संख्या १४, मुरुड गट संख्या २ गट व गण संख्या ४, रोहा गट संख्या ४ गट व गण संख्या ८, तळा गट संख्या २ गट व गण संख्या ४, माणगाव गट संख्या ४गट व गण संख्या ८, म्हसळा गट संख्या २ गट व गण संख्या ४, श्रीवर्धन गट संख्या २ गट व गण संख्या ४, महाड गट संख्या ५ गट व गण संख्या १०, पोलादपूर गट संख्या २ गट व गण संख्या ४ असे एकूण५९ जिल्हा परिषद गट व ११८ पंचायत समिती गण आहेत.

**आचारसंहिता लागू**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशानुसार मंत्री, आमदार किंवा अन्य पदाधिकाऱ्यांना मतदारांवर प्रभाव टाकतील असे कोणतेही धोरणात्मक निर्णय, घोषणा किंवा कृती करता येणार नाही.

**जात वैधता प्रमाणपत्र**

राखीव प्रवर्गातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. परंतु जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, जात वैधता समितीकडे प्रस्ताव केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची उमेदवारास मुभा असेल.

नामनिर्देशनपत्रे पारंपरिक ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. प्रत्येक मतदारास २ मते देण्याचा अधिकार राहील पहिले मतद जिल्हा परिषद सदस्यासाठी व दुसरे पंचायत समिती सदस्यासाठी. रायगड जिल्ह्यातील एकूण २ हजार ३२३ मतदान केंद्र आहेत. सर्व तालुक्यात पिंक मतदान केंद्र व आदर्श मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. सर्व मतदान केंद्रांवर सुस्थितीत खोल्या, शौचालये, पिण्याचे पाणी, रॅम्प आदी सुविधा उपलब्ध असतील.

# शेकापला संजीवनी देण्याचे काम भाजप करणार नाही -सतीश धारप

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात काँग्रेस उरलेली नाही. शेकाप संपत चालली आहे. त्यामुळे शेकापला संजीवनी मिळेल असे काम भाजप करणार नाही. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आमची शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांशी बोलणी सुरु आहे. युती न झाल्यास दक्षिण रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३७ जागा स्वबळावर लढण्याची तयारी भाजपने केली आहे. आमचे उमेदवार तयार आहेत, आशी माहिती भाजप दक्षिण रायगड जिल्हा महामंत्री सतीश धारप यांनी बुधारी (दि. १४ ) अलिबाग येथील आपल्या निवास्थानी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना दिली.

काँग्रेस या जिल्ह्यात उरलेली नाही. शेकाप संपत चालला आहे. शेकापसोबत युती करण्याचा प्रश्नच येत नाही. आम्ही शेकापला संजीवनी देण्याचे काम करणार नाही. काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांनी शेकापला संजीवनी दिली. ती चूक आम्ही करणार नाही , असे सतीश धारप म्हणाले.

रायगड जिल्हा परीषदेच्या दक्षिण रायगडमधील मतदारसंघांची जबादारी भाजपने माझ्यार सोपवली आहे. दक्षिण रायगडातील पेण, अलिबाग, महाड आणि श्रीवर्धन या चार विधानसभा मतदार संघात जिल्हा परिषदेचे ३७ मतदार संघ आहेत. याबबत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचाशी बोलणी सुरु आहे. या दोन्ही पक्षांना आमचे प्रस्ताव पाठवले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडे २१ तर शिवसेनेकडे १९ जागांचे प्रस्ताव दिले आहेत. या दोन्ही पक्षांनी आमचे प्रस्ताव मान्य केले नाही तर सर्व जागा स्वबळावर लढवण्याची आमची तयारी आहे , असे धारप यांनी स्पष्ट केले.

> **आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना प्रस्ताव पाठवले आहेत. आम्हाला योग्य वाटेल असा प्रस्ताव जो पक्ष स्वीकारेल त्या पक्षाबरोबर युती करण्याचे धोरण आहे. मतदासंघवार पदाधिकारयांच्या बैठका सुरू आहेत. त्यातून कार्यकर्त्यांची मते जाणून घेवून पुढील निर्णय घेवू.**
> **-सतीश धारप, जिल्हा महामंत्री, भाजप**

## खारीकवाडा आग नुकसानग्रस्तांना माजी सरपंचाकडून आर्थिक मदत

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील उसरोल ग्रामपंचायत हद्दीमधील खारीकवाडा परिसरातील रमेश पाटील व प्रभाकर पाटील यांच्या घराला सोमवारी आग लागली होती. या आगीमुळे घराचे छप्पर ,लाकडी कपाट, कपडे व भांडी जळून खाक झाली होती. सदरची घटना घडताच सरपंच मनीष नांदगावकर व माजी सदस्य नवनाथ तांबोळी निकिता कोरलेकर हे स्वतः त्या जागी पोहचून या दोघांनाही रोख आर्थिक रकमेची मदत केली आहे. यावेळी या घरात राहणारे अपंग व्यक्ती यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देणार आहेत

# श्रीवर्धन नगर परिषदेच्या जलवाहिन्या फुटल्यामुळे नागरिक त्रस्त

**श्रीवर्धन : बातमीदार**

दोन वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेकडून श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन शहरापर्यंत नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम करण्यात आले. त्याचप्रमाणे रानवली पाझर तलाव या ठिकाणी नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. कोल्हापूर येथील रविराज इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने सदर जलशुद्धीकरण प्रकल्प निर्माणाचे व जलवाहिन्या बदलण्याचे काम केले आहे. मात्र या जलवाहिन्या बदलण्याच्या कामामध्ये जलवाहिन्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या वापरल्यामुळे जेव्हापासून हे काम पूर्ण झाले आहे तेव्हापासून नियमितपणे जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत आहेत.

या कामाचा लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे व मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत मोठा गाजावाजा करून करण्यात आला होता. परंतु जलवाहिन्या बदलण्याचे काम सुरू असताना त्यावरती श्रीवर्धन नगरपरिषदेकडून तज्ञ व्यक्तीची नेमणूक होणे गरजेचे असताना, केवळ ठेकेदाराच्या सोयीप्रमाणे काम करून घेण्यात आल्याने काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. रानवली पाझर तलाव ते श्रीवर्धन या मार्गावरती रोज कुठे ना कुठेतरी जलवाहिनी फुटण्याचे प्रकार घडतात व पाझर तलावातील लाखो लिटर पाणी वाया जात आहे.



श्रीवर्धनच्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे या हेतूने जलशुद्धीकरण प्रकल्पाची उभारणी करण्यात आली. परंतु जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सुद्धा श्रीवर्धन शहरातील नागरिकांना अनेक वेळा गढूळ पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे जलशुद्धीकरण प्रकल्पामध्ये नक्कीच शुद्धीकरण होते की दूषितिकरण होते. असा प्रश्न नागरिकांना पडलेला पाहायला मिळतो. श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी नेमणूक करण्यात आलेली नाही. अन्य नगर परिषदेच्या किंवा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे श्रीवर्धन नगरपरिषदेचा कार्यभार सोपवण्यात येतो. पर्यायाने फिरत्या रंगमंचा प्रमाणे श्रीवर्धन नगरपरिषदेच्या कामगारावर याचा गंभीर परिणाम झालेला दिसून येतो.

पाणी वेळेवर येत नसल्यामुळे श्रीवर्धन मधील नागरिकांना नेहमीच मनस्ताप सहन करावा लागतो. तरी या सर्व प्रकाराबाबत श्रीवर्धन नगर परिषदेने एखाद्या तज्ञ अभियंत्यांची नेमणूक करून झालेल्या कामाचे पुन्हा एकदा ऑडिट करावे. अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

> **श्रीवर्धन नगरपरिषदेला पाणीपुरवठा करणाऱ्या पाझर तलावापासून श्रीवर्धन पर्यंत जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत आहेत हे मान्य आहे. परंतु पाण्याला प्रेशर कमी केले तर जलवाहिन्या फुटणार नाहीत, परंतु शहरातील काही भागांमध्ये पाणीपुरवठा त्यामुळे होत नाही. त्यासाठी एक ठराविक प्रेशरने पाणी सोडावेच लागते. यासाठी आमचे अभियंते प्रयत्न करताहेत व लवकरच आम्ही यातून मार्ग काढू.**
> **-विठ्ठल राठोड, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगर परिषद**




**अलिबाग: जिल्हा परिषद निवडणुका जाहीर होताच आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील राजकीय बॅनर काढण्यात आले.**

# श्रीवर्धन शहरात सहलीच्या मोठ्या बसेसमुळे स्थानिक नागरिकांची डोकेदुखी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरात सहलीच्या येणाऱ्या मोठ्या बसेसमुळे स्थानिक नागरिकांना डोकेदुखी होत असल्याची बाब समोर आली आहे. कारण श्रीवर्धन शहरातील सर्वच रस्ते प्रचंड अरुंद आहेत. मोठ मोठ्या दोन बसेस समोरून आल्यानंतर त्या पास होताना दहा ते पंधरा मिनिटांचा कालावधी लागतो. एकावेळी एकाच विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या पाच पाच बसेस लागोपाठ असतात. तर त्या अगोदर शहरात आलेल्या



बाहेर पडणाऱ्या बसेस देखील रांगेमध्ये पाच ते सहा असतात. त्यामुळे सदरची वाहतूक कोंडी सुटण्यासाठी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ नक्कीच जातो.

त्यामुळे आपल्या घरातून बाजारात दूध आणण्यासाठी गेलेल्या नागरिकाला देखील एक एक तास वाया घालवावा लागतो. वाहतूक कोंडीची ही समस्या लक्षात घेऊन श्रीवर्धन पोलिसांनी सहलीच्या येणाऱ्या बसेस श्रीवर्धन बस स्थानकामध्येच थांबवून विद्यार्थ्यांना पायी समुद्रकिनाऱ्यापर्यंत पाठवावे. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. जे विद्यार्थी श्रीवर्धन येथे वस्तीसाठी असतात अशाच लोकांच्या बसेस शहरामध्ये पाठवाव्या. जे फक्त समुद्रकिनारा पाहून लगेच परत जाणारे असतात अशा सहलींच्या बसेस श्रीवर्धन बस स्थानकावर उभ्या करून ठेवाव्यात. जेणेकरून स्थानिक नागरिकांना त्रास होणार नाही.

ADV. RUPALI A. GAIKWAD

**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF DISTRICT JUDGE PANVEL AT PANVE**

CIVIL M. A.4/2026.
Exh-

SMT.SHWETHA RAVINDRA SHETTY.
W/O. LATE MR. RAVINDRA KAHABALA SHETTY
Age about 39 years, Occupation: SERVICE Residing at. 701, Shree Ganesh Darshan Building, Jaideep Nagar, Opp Nahur East Railway Station, Bhandup East, Mumbai, Maharashtra 400042. ......... Applicant

V.S.

NIL ........... Opponent

Whereas SMT. SHWETHA RAVINDRA SHETTY, the applicant herein, has filed the above Civil Application No. of 2025 for the grant of a Guardian Certificate, an Application under Section 8, 10, and 29 of the Guardians & Wards Act 1890 R/w. Sections 6 and 8 of The Hindu Minority and Guardianship Act, 1956, with respect to the mother and natural guardian of the above-named minors, **MISS. DEETYA RAVINDRA SHETTY and MASTER SHRIHAAN RAVINDRA SHETTY.** held by the deceased **LATE MR. RAVINDRA KAHABALA SHETTY,** i.e., the biological father of the said minors, has expired **11/07/2018.at MANSA DEVI TULSIDAS AGARWAL, MUNICIPAL GENERAL HOSPITAL,** leaving behind the applicant as the legal heirs and the properties mentioned herein below: PROPERTY DETAILS-

SWARAJ KINGSTON, FLAT NO 701, 7th FLOOR, C WING, PLOT NUMBER 47. SECTOR 18, ULWE,

TALUKA- PANVEL, DISTRICT- RAIGAD, Area 367 Sq.Ft.Carpet Area, Sub-Registrar of Panvel-4. under Registration No. 1297/2012, dated 08/11/2012. The said plot property has been conferred upon **SMT.** SHWETHA RAVINDRA SHETTY, (Applicant herein), and **MISS. DEETYA RAVINDRA SHETTY and MASTER SHRIHAAN RAVINDRA SHETTY.** (Minor) as owners vide a **HEIRSHIP CERTIFICATE, dated 17/06/2022, passed by the Civil Judge, Senior Division, PANVEL in CIVIL M. A. 1446/2021...**

ALL PERSONS having any claim or objection to my being appointed as the legal guardian of the said minor is hereby informed to file her/his objection with respect to before the Court of Civil Judge District Judge, Panvel, within **Thirty (30) days** from the date hereof otherwise it will be deemed that there is no objection and the application may be entertained as per Law.

Today, on this 08 day of January 2026

Court Seal

**sd/-**
**By Order**
**Asst. Superintendent**
**Civil District Court, Panvel**

# विळे-भागाड एमआयडीसीत भूमीपूत्रांना कायमस्वरूपी रोजगार द्या -ॲड. साबळे

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील विळे-भागाड मएमआयडीसी परिसरातील सर्व कारखान्यांमध्ये स्थानिक भूमीपूत्रांना प्राधान्य देऊन कायमस्वरूपी रोजगार द्यावा, अशी ठाम व रास्त मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व कोकण विभाग संघटक ॲड. राजीव साबळे यांनी केली आहे. ही मागणी दुर्लक्षित केल्यास पोस्कोसह सर्व कंपन्यांविरोधात हजारो भूमीपूत्रांना सोबत घेऊन तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.



तळेगाव येथे पार पडलेल्या मराठी शाळेच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलताना ॲड. साबळे यांनी स्थानिकांच्या व्यथा मांडत व्यवस्थेवर कठोर शब्दांत टीका केली.

१९९० साली माझे वडील आमदार असताना विळे-भागाड परिसरात एमआयडीसी मंजूर करून आणली. त्यानंतर विद्यमान खासदार सुनील तटकरे यांनी सुरक्षित कारखान्यांची मुहूर्तमेढ रोवली. मात्र आज त्या विकासाचा लाभ स्थानिकांना न मिळता दलाल, ठेकेदार आणि बाहेरील लोकांच्या घशात जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

एमआयडीसीतील अनेक कारखान्यांमध्ये स्थानिक कामगार वर्षानुवर्षे रोजंदारीवर राबत असतानाही त्यांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेतले जात नाही, ही गंभीर बाब असल्याचे ॲड. साबळे यांनी नमूद केले.ठेकेदारी पद्धतीमुळे कामगारांचे शोषण सुरू असून, न्याय मागणाऱ्यांना डावलले जाते. हा अन्याय सहन केला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

विळे-भागाड परिसरातील अनेक तरुण अभियांत्रिकी, आयटीआय, डिप्लोमा व उच्च शिक्षण घेतलेले, प्रशिक्षित आणि कुशल असूनही बेरोजगार आहेत. मात्र स्थानिक कारखान्यांमध्ये त्यांना संधी दिली जात नसल्याने मुंबई, पुणे, ठाणे, गुजरात येथे रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे. यामुळे गावे ओस पडत असून, ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडत चालली आहे. केवळ शेतीवर अवलंबून राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह शक्य नाही, अशी खंतही व्यक्त केली.

## समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत स्वच्छता मोहिमेचे आयोजन

**अलिबाग: प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अभियानाचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे याठिकाणी शुक्रवारी (दि.१६) सामुहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

आपल्या घरासह आपल्या आजूबाजूचा परिसरही जर स्वच्छ राहिला तर रोगराईला आळा बसणार आहे. त्यामुळे स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेउन समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सामुहिक स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील प्लास्टिक, सुका व ओला कचरा गोळा करुन त्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात येणार आहे. या अभियानात तालुका, ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी, कर्मचा-यांसह मोठ्या संख्येने नागरिकांनीही सहभाग घ्यावा व आपले गावे व परिसर स्वच्छ, सुंदर होतील, यासाठी प्रयत्न करावेत,

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**

**तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil.khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि./एसआर ४८/२०२५/४०८

**१) श्री. संजय प्रल्हाद पवार** } वादी
रा. नढाळ, ता. खालापुर, जि. रायगड

**विरुध्द**

**१) निबंधक, जन्म-मृत्यु नोदणी अधिकारी,** } प्रतिवादी
ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली, ता. खालापूर, जि. रायगड

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार **श्री. संजय प्रल्हाद पवार, रा. नढाळ, ता. खालापुर, जि. रायगड** (अपिलार्थी) यांनी यांचा मुलगा **कै.सुरेश संजय पवार** यांचा मृत्यू दिनांक १२/०७/२००६ रोजी नढाळ, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि. १३/०१/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण :- खालापूर
दिनांक : १३/०१/२०२६

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार खालापूर

# मोहोपाडा थांब्याजवळ ट्रॅफिकचा विळखा

## रसायनी पोलिसांची कारवाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील मैदान ते विज वितरण कार्यालय या रस्त्यावरील दोन्ही बाजूंचे अतिक्रमण,रस्त्यालगतच्या हातगाड्या यामुळेच दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे नागरिक हैराण झाले असून, याची गंभीर दखल घेत रसायनी पोलीस प्रशासनाने कडक कारवाई सुरू केली आहे.यातच मोहोपाडा ग्रामस्थांनीही गाव बैठकीत स्थानिक सदस्यांच्या उपस्थितीत ठराव घेवून रस्त्यालगतच्या अतिक्रमणांवर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.



मोहोपाडा परिसरातील मुख्य बाजारपेठेत बेकायदेशीर पार्किंग, रस्त्यावर उभ्या केलेल्या हातगाड्या, तसेच वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन यामुळे सतत ट्राफिक जाम होत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे शालेय विद्यार्थी, नोकरदार वर्ग, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर रसायनी पोलिसांनी विशेष वाहतूक मोहीम राबवून बेकायदेशीररीत्या उभ्या केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. तसेच अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाल्यांना हटवून रस्ता मोकळा करण्यात सुरूवात केली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनचालकांवर चलन काढण्यात आले.

या वेळी पोलीस प्रशासनाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, ही कारवाई केवळ एकदाच न होता भविष्यातही नियमितपणे सुरू राहणार आहे. नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन रसायनी पोलिसांनी केले असून मौजे मोहोपाडा ग्रामस्थ मंडळ यांनी रस्त्यावरील अतिक्रमण, हातगाड्या हठविण्यासाठी पाऊल उचलले आहे.

# पनवेल आगारातील पाणपोई बंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एस.टी. बस डेपोमध्ये नागरिकांसाठी असलेली पानपोई गेल्या एक महिन्यापासून बंद अवस्थेत असून, याचा मोठा फटका प्रवासीवर्गाला बसत आहे. डेपोतील पाण्याच्या पंपाला जोडलेल्या वीज लाईन्स खराब झाल्यामुळे पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. परिणामी, प्रवाशांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे.

उन्हाळ्याची सुरुवात झाली असताना पाणपोई बंद राहणे ही गंभीर बाब असून, ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, मागील वेळी परिवहन सेवेचे मंत्री पनवेल दौऱ्यावर आले असताना पाणपोई सुरू होती, मात्र त्यानंतर पुन्हा दुर्लक्ष झाले



आहे. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून पाणपोई सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे. पनवेल एस.टी. बस डेपो हा कोकण, पुणे, मुंबई तसेच नवी मुंबईकडे जाणाऱ्या हजारो प्रवाशांचा प्रमुख केंद्रबिंदू आहे.

दररोज पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत मोठ्या प्रमाणावर प्रवासी ये-जा करत असतात. अशा ठिकाणी मूलभूत सुविधा असलेली पाणपोई बंद राहणे हे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रवाशांनी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याचे चित्र आहे. काही प्रवाशांनी खासगी पाणी विक्रेत्यांकडून महागडे बाटलीबंद पाणी खरेदी करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. उन्हाळ्यात उष्णतेचा पारा वाढत असताना पिण्याच्या पाण्याअभावी प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एस.टी. महामंडळ वच संबंधित विभागाने तातडीने बीज लाईन दुरुस्ती करून पानपोई सुरू करावी, तसेच पर्यायी स्वरूपात पाणी टँकर किंवा तात्पुरती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व प्रवासी वर्गाकडून होत आहे. संबंधित प्रशासन काय उपाययोजना करते, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# उरण महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभागाच्या वतीने महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचा जयंती दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी या वेळी स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रावर प्रकाश टाकताना भारताच्या युवकांसाठी प्रेरणेचा स्त्रोत म्हणून विवेकानंदांकडे पाहते असे सांगितले तसेच विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या चरित्राचा अभ्यास करून महापुरुषांच्या विचारांचे चिंतन व मांडणी केली पाहिजे असे प्रतिपादन केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. एम.जी. लोणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक करून स्वामी विवेकानंदांच्या रामकृष्ण मिशनचे कार्य स्पष्ट केले. तर राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांच्यावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी प्रकाश टाकला उसुराज्य उभारणीत जिजाऊंचे योगदान विशद केले.

कार्यक्रमात आयक्युऐसी कॉर्डिनेटर डॉ.ए.आर. चव्हाण, सहयोगी प्राध्यापक व्हि.एस इंदुलकर, कार्यालयीन अधीक्षक तानाजी घ्यार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## दिनदर्शिका प्रकाशन



**पनवेल : भाजप पुरस्कृत जागृती स्वयंरोजगार शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने सन २०२६ सालासाठी तयार करण्यात आलेल्या नूतन दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. माजी खासदार लोकनेते खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख,माजी सरपंच कमळा देशेकर, कांचन वास्कर आणि ध्रुव पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जागृती संस्थेच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचे कौतुक केले.**

# उच्च परताव्याचे आमिष दाखवून नऊ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

एआय ट्रेड या ॲप्लिकेशनमध्ये गुंतवणूक करून १२ ते १४ टक्के उच्च परताव्याचे आमिष दाखवून नऊ लाख १५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपाली अमृतकर या करंजाडे, सेक्टर ६ येथे राहतात. त्यांनी सोशल मीडियावर एआय ट्रेडमध्ये गुंतवणूक करून १२ ते १४ टक्के नफा मिळवण्याबाबत जाहिरात पाहिली होती. त्यावर त्यांनी हे अँप डाऊनलोड केले आणि त्यांचे खाते उघडले. त्यांनी सुरुवातीला गुंतवणूक केली. या वेळी त्यांना ॲपमध्ये गुंतवणुकीचा परतावा दिसत होता. सुरुवातीला पैसे काढून खात्री केली आणि त्यांचे पैसे बँक खात्यामध्ये जमा झाले. त्यामुळे त्यांनी पती व सासूचे अकाऊंट ॲपमध्ये सुरू करून गुंतवणूक केली.

या तिघांच्या अकाऊंटमध्ये त्यांनी एकूण नऊ लाख १५ हजाम ६४५ रुपये गुंतवले. त्यानंतर त्यांनी या ॲप्लिकेशनवर पैसे काढण्याची रिक्वेस्ट टाकली, मात्र त्यांना पैसे काढता येणार नाहीत, असे सांगण्यात आले. तसेच मोबाईल नंबर बंद आढळले. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

रस्ता सुरक्षा अभियान जानेवारी २०२६ अंतर्गत कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या मदतीकरिता टाटा मेमोरियल सेंटर खारघर यांच्या सहकार्याने पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्था, पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल आम्ही रक्तदाते पनवेलचे, श्री प्रल्हादराव झुलेलाल ट्रस्ट, पनवेल नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघ, पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब, रोट्रॅक क्लब ऑफ पनवेल एलाईट यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन विश्राळी नका पनवेल येथे आयोजित करण्यात आले होते.

उद्घाटन पनवेल आरटीओचे अशितोष दौंडे व स्थानिक लोकाधिकार समिती ओएनजीसी उरण चे पदाधिकारी उज्ज्वेश तुपे यांच्या हस्ते करण्यात आले. वाढत्या लोकसंख्येमुळे रस्ता सुरक्षा खूपच महत्त्वाची आहे असे उदगार आरटीओ अशितोष दौडे यांनी काढले. मनुष्याने सर्वकाही लॅबोरेटरी मध्ये बनवले परंतु तो रक्त बनवू शकला नाही म्हणून रक्तदान करत रहा असा सल्ला तुपे यांनी रक्तदान शिबिराला शुभेच्छा देताना दिला.



या रक्तदान शिबिरामध्ये ईसीजी, नेत्र तपासणी , रक्त शर्करा तपासणी याचबरोबर अवयव दान विषयावर इंदुमती ठक्कर यांनी रक्तदात्यांना संबोधित केले. रक्तदान शिबिरामध्ये १८२ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला.

शिबिराकरिता ॲड. मनोहर सचदेव, पांडुरंग हुमणे, किसन रौंदळ, ॲड. अमोल साखरे, मुरलीधर ढाके, भूषणजी चोणकर, विक्रांत बगाडे, सचिन भिसे, उज्वला भिसे, व संगीता साखरे, वंशी देडिया यांनी परिश्रम घेतले. यानंतर १२ एप्रिल २०२६ पुढील रक्तदान शिबिराची तारीख जाहीर करण्यात आली.

# पनवेल रेल्वे भुयारी मार्ग पुन्हा सुरू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकात सकाळी व संध्याकाळी चाकरमान्यांसह लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. पनवेलकडे जाण्यासाठी एकाच उड्डाणपुलावर अवलंबून राहावे लागत असल्याने संभाव्य अनुचित प्रसंग टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अखेर स्थानकातील भुयारी मार्ग पुन्हा सुरू केला आहे.

या निर्णयामुळे नवीन पनवेलकडे जाण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाला असून, प्रवाशांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, प्रत्यक्षात भुयारी मार्गातून मोठ्या प्रमाणावर सामान घेऊन जाणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जड बॅगा, ट्रॉली तसेच अपुऱ्या सुविधांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. स्थानकात लिफ्ट, रॅम्प किंवा स्वतंत्र व्यवस्था नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग प्रवाशांचे विशेष हाल होत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी घेतलेला निर्णय स्वागतार्ह असला तरी आवश्यक सुविधा नसल्याने हा निर्णय अर्धवट ठरत असल्याची भावना प्रवासी व्यक्त करत आहेत.

# कोकण मराठी साहित्य परिषदेचे कविसंमेलन

**उरण : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप)पेण शाखेचे पोपटी कवि संमेलन कळवे या गावी शेतामध्ये प्रसन्न वातावरणात साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.एल बी यांनी जिल्ह्यात झालेल्या पोपटी संमेलनात केंद्रीय प्रतिनिधी गणेश कोळी, सुरेश वाजेकर, बळीराम भालेकर आणि लवेंद्र मोकल यांच्या योगदानाचे भरभरून कौतुक केले. या वेळी रायगड कोमसाप कोषाध्यक्ष ॲड.गोपाळ शेळके, ज्येष्ठ कवी म.वा. म्हात्रे, नाटककार चंद्रकांत पाटील, कोमसाप उरण अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे,



जिल्हा प्रतिनिधी एस.एस.पाटील इत्यादी प्रमुखांची उपस्थिती होती. स्वागत प्रास्ताविक पेण शाखाध्यक्ष लवेंद्र मोकल यांनी केले तर सुरेख सूत्रसंचालन प्रकाश ठाकूर यांनी केले.

दीप प्रज्वलनानंतर पोपटीची सुगंधी शेतमळ्यातील चव कवी आणि उपस्थित प्रेक्षकांना मनसोक्त घेता आली. पोपटीचा आनंद घेतांघेतां म.वा.म्हात्रे, सदानंद ठाकूर, संतोष जोहेकर, म.का.म्हात्रे, अजय शिवकर, रामनाथ पेंटर, डी.एल.पाटील, मोहनलाल म्हात्रे, जनार्दन सताणे,न.ग. पाटील, मनोज म्हात्रे,नरेश पाटील, संतोष ठाकूर, गणेश पाटील, नरेश म्हात्रे,लवेंद्र मोकल, गोपाळ शेळके, साहित्यरत्न प्रा एल.बी. इत्यादी कवींनी दर्जेदार कविता सादर करून पोपटीला रंगत आणली.

विशेष म्हणजे पोपटी, दारू, नीतीअनिती, प्रेम, सामाजिक प्रश्न, दूषित राजकारण, पोवाडा, शिवाजी महाराजांच्या जीवन विषयक कवितांनी भारावून टाकणारे वातावरण निर्माण केले. त्यानंतर उपस्थितांनी शेतमळ्यातील शाकाहारी आणि मांसाहारी स्वादिष्ट जेवणाचा आनंद घेतला. अशा प्रकारे रायगड जिल्हा कोमसापचे २१ वे आणि शाखेचे दुसरे पोपटी कविसंमेलन मोठया उत्साहात झाले.

# सावळे शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावळे येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलेचे उत्तम सादरीकरण केले.

या वेळी माजी सभापती गजानन माळी, सरपंच प्रफुल्ल माळी काशीनाथ कांबळे, शिक्षक लक्ष्मण माळी, शिक्षक पद्माकर झिंगे, शिवाजी माळी, सुनील माळी, विष्णु पवार, जांभुळकर, मुख्याध्यापिका अर्चना डोंगरे, शिक्षक भिकाजी कदम, शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष उपाध्यक्ष उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन जयवंत म्हात्रे, निवास म्हात्रे, विष्णु दळवी तसेच गावातील महिला पुरुष विद्यार्थी उपस्थित होते.

# उरणमध्ये पोपटी पार्ट्यांची चवदार रंगत सुरू

## फुंडे महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी लुटला पोपटीचा आनंद

**उरण : बातमीदार**

फुंडे महाविद्यालयातील १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी कोप्रोली येथे एकत्र येऊन आपल्या विद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देत पोपटीचा आनंद हा गाणी गुणगुणत,हसत, खेळत, गप्पा, मज्रा मस्ती करत लुटला.

वालाच्या शेंगां भामरुडाच्या (भांबुर्डी) पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजविल्या जातात. त्यामध्ये बटाटा तसेच अंडी, चिकन घालून त्यांची लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. सध्या उरणात सर्वत्र पोपटी पार्ट्यांची धम्माल सुरु झाली असली तरीसुद्धा पुण्यावरुन आलेल्या वालाच्या शेंगाच वापरल्या जात आहे. रायगड सह उरणच्या मातीत पिकविलेल्या चवदार टपोर्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या



पोपटीलाच अधिक पसंती आहे.

अजुन साधारण पंधरा - वीस दिवसानंतर तालुक्यातील गावठी वाल तयार होऊ लागतील आणि खऱ्या अर्थाने पोपटीला ती विशिष्ठ चव येणार आहे. या पोपटीतील वालाच्या शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही हे त्यांचे वैशिष्ट आहे. पुण्यावरुन आलेल्या शेंगा साधारण ४० ते ५० रुपये किलोनी मिळत आहेत.

विदर्भात, खानदेशात ज्याप्रमाणे ज्वारी किंवा बाजरीच्या कणसांना भाजुन केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच रायगड-उरण मध्ये गावठी वालाच्या शेंगांची पोपटी प्रसिद्ध आहे. शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची धम्माल पहायला मिळते. येथे गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाण घेवाणही होते.

अशातच फुंडे महाविद्यालयात १९९८-९९ मध्ये शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन रविवारी पोपटी संमेलनाचे आयोजन केले होते. या वेळी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत पोपटीचा आनंद हा गाणी गुणगुणत हसत, खेळत, गप्पा, मज्रा मस्ती करत लुटला आहे. या वेळी सर्व सहकार्यांना एकत्र आणण्याचे काम आदर्शवत विद्यार्थी मेघा भोईर, संजीवनी म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, अलंकार म्हात्रे, मेघनाथ पाटील, संध्या घरत,उत्तम पाटील, गंधार पाटील, प्रभाकर गावंड, गिरीश पाटील, महेंद्र घरत, दिनेश म्हात्रे, रुपाली म्हात्रे, सुरेखा म्हात्रे, दमयंती पाटील, रंजित माळी, मनोजकुमार ठाकूर, सुवर्णा पाटील, राजेंद्र पाटील, विनोद ठाकूर, ज्योत्स्ना पाटील, प्रसाद पाटील, नवनीत पाटील, नितीन नारंगीकर यांनी केले आहे.

# गव्हाण विद्यालयात लोकनेते दि.बा.पाटील यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा.पाटील यांच्या शतकमहोत्सवी जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचे हस्ते लोकनेते दि.बा.पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ अर्पण करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, वर्गशिक्षक



प्रमोद करावकर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, ज्युनिअर कॉलेजचे ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र चौधरी यांचेसह मोनाली बाबर, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी, चंद्रकांत मढवी, धनाजी ठाकूर आप्पा, जनार्दन खैरे, अरूण कोळी, अन्य अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता आठवी ड या वर्गाच्या वतीने वर्गशिक्षक प्रमोद करावकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

विद्यार्थ्यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जीवनावर आधारित व भूमी पुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या स्फूर्तीदायी लढ्यातील महत्त्वाच्या प्रसंगांचा उल्लेख करणारी भाषणे केली. क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# माणगावच्या जुन्या टपाल कार्यालयाची दयनीय अवस्था

## ब्रिटिशकालीन वास्तू भग्नावस्थेत



**माणगाव: प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या इतिहासाची साक्ष देणारे आणि एकेकाळी परिसराच्या दळणवळणाचा कणा असलेले जुने टपाल कार्यालय आज अक्षरशः मृतप्राय अवस्थेत पडून आहे. ब्रिटिशकालीन वारसा लाभलेली ही वास्तू आज शासनाच्या अनास्थेमुळे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे भग्नावस्थेत रूपांतरित झाली आहे. भिंती कोसळलेल्या, छप्पर उडालेले, सर्वत्र झाडेझुडपे आणि वेलींनी वेढलेली ही इमारत पाहून कोणत्याही संवेदनशील नागरिकाचे मन हेलावून जाईल, अशीच स्थिती सध्या येथे आहे.

विशेष म्हणजे, माणगावचे टपाल कार्यालय तब्बल ५० वर्षांपासून भाड्याच्या इमारतीत सुरू आहे. वेळेत स्वतःची इमारत उभी न राहिल्याने आजवर लाखो रुपये शासनाला भाड्यापोटी मोजावे लागले आहेत. हा पैसा जर वेळेवर इमारत उभारणीसाठी वापरला असता, तर आज माणगावला सुसज्ज आणि आधुनिक टपाल कार्यालय उपलब्ध झाले असते, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

सध्या माणगावचे टपाल कार्यालय व उपविभागीय टपाल कार्यालय मोरबा रोडवर, माजी आमदार अशोकदादा साबळे यांच्या निवासस्थानाच्या मागील बाजूस असलेल्या दोन मजली भाडेकरू इमारतीत कार्यरत आहे. या इमारतीसाठी दरमहा सुमारे ३३ हजार रुपये भाडे दिले जाते. येथून माणगावसह तळा, पाली, म्हसळा आणि श्रीवर्धन या तालुक्यांतील टपाल कार्यालयांचे कामकाज पाहिले जाते. एवढ्या मोठ्या विभागाचा कारभार भाड्याच्या इमारतीतून चालवावा लागणे, ही बाबच शासनाच्या नियोजनशून्यतेचे द्योतक आहे.

दरम्यान, जुने माणगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेसमोर असलेले मूळ टपाल कार्यालय सुमारे १५ गुंठे जागेत पसरलेले असून ते पूर्णतः पडीक अवस्थेत आहे. वड, पिंपळाच्या भल्या मोठ्या वेलींनी ही ऐतिहासिक वास्तू अक्षरशः गिळून टाकली आहे.

रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना ही ब्रिटिशकालीन वास्तू अस्तित्वात आहे, हेही कळू नये, इतकी ती झाकली गेली आहे. काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचेही चित्र दिसून येते. सर्वत्र पाला-पाचोळा, झुडपे आणि भयाण शांतता पसरलेली आहे.

या परिस्थितीला जबाबदार कोण, हा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. शासकीय अधिकाऱ्यांची अनास्था आणि लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष यामुळे माणगावचा हा ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, सुमारे ८ वर्षांपूर्वी येथील तत्कालीन पोस्टमास्तर स्वर्गीय बनेश जोशी यांनी या जागेवर नवीन टपाल कार्यालय इमारत उभारण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मुंबई व दिल्ली येथील मुख्य कार्यालयांना पाठवली होती. त्या अनुषंगाने जागेचे सर्वेक्षणही करण्यात आले होते. मात्र, तब्बल आठ वर्षे उलटून गेली तरी प्रत्यक्षात एकही वीट रचली गेली नाही.

याबाबत अधिक चौकशी केली असता, नव्याने प्रस्ताव दिल्ली येथे पाठवण्यात आला असून सध्या निधीच्या प्रतिक्षेत असल्याचे पनवेल येथील टपाल कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, केवळ प्रस्ताव आणि कागदोपत्री हालचालींमध्ये किती वर्षे घालवायची, माणगावच्या विकासाचा विचार करता, आधुनिक टपाल कार्यालय ही काळाची गरज आहे. ऐतिहासिक वास्तूचे जतन करत, त्या जागेवर तातडीने नवीन टपाल इमारत उभारावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

# रस्ते सुरक्षा म्हणजे जीवन सुरक्षा

## वाहतूक नियमांचे पालन करा -सुर्यकांत गंभीर



**मुरुड : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करुन नागरिकांचे मौल्यवान जीव सुरक्षीत ठेवणे ही आपली सामूहीक जबाबदारी आहे.यासाठी प्रत्येकांने वाहतूकीचे नियम काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे असे प्रतिपादन मोटार वाहन निरीक्षक सुर्यकांत गंभीर यांनी मुरूड येथे रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत आयोजित आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी कार्यक्रमावेळी बोलत होते.

यावेळी मोटार वाहन निरीक्षक -सुर्यकांत गंभीर ,किरण लोंढे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विशाल जाधव,गणेश भंडारे, सुशांत वडके,असलम हमदुले, प्रकाश नाकटी ,उदय थळे,असलम कासकर,आदिंसह तरुण तरुणी नागरिक उपस्थित होते.

मोटार वाहन निरीक्षक सुर्यकांत गंभीर पुढे म्हणाले की,राष्ट्रीय रस्ते सुरक्षा १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र सरकार व राज्य सरकार निर्देशानुसार रस्ता सुरक्षा अभियान राबवली जाते त्यांच अनुषंगाने उपप्रदेशिक परिवहन अधिकारी - माधव सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आज मुरूड येथील एसटी डेपोत रस्ता सुरक्षा अभियान राबवत आहोत वाहन चालकांचे डोळे व कान चांगले असावे त्याकरिता आज आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे.

वाहन चालकांनी आपल्या गाडीचा वेग मर्यादा पाळणे आवश्यक आहे.दारु पिऊन गाडी चालु नये, हेल्मेट वापरणे,गाडी चालवताना मोबाईल वर बोलु नये ,गाडी चालवताना आपल्या व दुसऱ्याच्या गाडीमध्ये सुरक्षीत अंतर असावे, पादचारी यांनी नियम पाळणे आवश्यक आहे. कधी ही चालताना उजव्या बाजुने चालावे, रस्त्या ओलांडताना दोन्ही बाजुने बघुन रस्ता ओलांडावे हे जर नियम आपण आपल्या पासुन जर सुरुवात केली तर कधी ही कुठे अपघात होणार नाही.यांची दशता घेऊन वाहतूकीचे नियमांचे पालन करुया असे आवाहन मोटार वाहन निरीक्षक सुर्यकांत गंभीर यांनी केले.

# रायगड पोलीस दलातील मॅक्स श्वानाचा मृत्यू

## अनेक गुन्हे उघडकीस आणण्यासाठी योगदान



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलाच्या श्वान पथकातील लॅब्रोडर जातीच्या मॅक्स या नावाचा श्वानाचा मंगळवारी (दि १३) मृत्यू झाला.

मॅक्सने रायगड पोलीस दलात श्वान पथकात १० मार्च २०१७ रोजी दाखल झला होता. मॅक्सने राष्ट्रीय श्वान प्रशिक्षण केंद केंद्र, टेकनपूर, ग्वालियर, मध्यप्रदेश येथे प्रशिक्षण पूर्ण केले. मॅक्सचे काम स्फोटक पदार्थ शोधण्याचे होते. त्याने एकूण ७८ बक्षीसे मिळवली. एकूण ४३६ व्ही व्ही आय पी कॉल काम केले. पेण बस स्थानकातील थ्रेड कॉल, माणगाव येथील गावठी बॉम्ब शोधणे, श्रीवधयन येथील स्मोकर सेल, रेवदांडा येथील बोया वरील जी पी एस शोधण्यास मदत, रोहा येथील गावठी बॉम, खालापूर येथील गावठी बॉम, अलिबाग समुदाकिनाऱ्यावरील स्मोकर सेल शोधने अशी महत्वाची कामे मॅक्सने केली. त्याने २०२३ मध्ये कोकण कर्तव्य मेळ व स्पर्धेममध्ये प्रथम क्रमांक मिळवला होता. राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री अशा अती महत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यामध्ये मोलाचे योगदान दिले. मॅक्सवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रोह्याच्या मेढे हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील मेढे विभागातील कोकण एज्युकेशन सोसायटी संचलित वसंतराव व शांताबाई पटवर्धन विद्यामंदिर (मेढे हायस्कूल) येथे रोहा तालुका भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष तसेच राजमुद्रा फाउंडेशनचे संस्थापक अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत राजमुद्रा फाउंडेशनच्या माध्यमातून शाळेतील १७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य (दप्तर) वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद दिसून आला.

कार्यक्रमप्रसंगी हायस्कूलचे चेअरमन भगवान गोवर्धने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आज घेण्यात आलेला हा शैक्षणिक उपक्रम सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. मेढे हायस्कूलमध्ये कष्टकरी, शेतकरी व ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेत असून अशा विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही मोलाची बाब आहे. अमित घाग यांचे कार्य समाजोपयोगी असून त्यांची कारकीर्द उल्लेखनीय आहे. त्यांचे कार्य म्हणजे खऱ्या अर्थाने शून्यातून विश्व निर्माण करणारे आहे. शाळेच्या उन्नतीसाठी आमचे नाते अतूट राहील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना अमित घाग म्हणाले की, १ ते १२ तारखेपर्यंत 'सेवा सप्ताह आमचा' हा उपक्रम सुरू असून आम्ही सदैव सेवेसाठी तत्पर राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमास भाजपा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, उपस्थित होते.

# आडघर शाळेत राजमाता जिजाऊ जयंती साजरी



**माणगाव: बातमीदार**

रायगड जिल्हा परिषद शाळा आडघर येथे स्वराज्यसंस्थापिका, शिवछत्रपतींच्या प्रेरणास्थान राजमाता जिजाऊ मासाहेब यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक संतोष मोहिते सर, माजी ग्रामपंचायत सदस्या पुनम दसवते, अंगणवाडीसेविका कांचन ढेपे, मदतनीस दीप्ती दसवते, शाळा व्यवस्थापन कमिटी सदस्य अध्यक्ष नीलिमा टेंबे,ग्रामपंचायत सदस्या श्रावणी दसवते , शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर भाषणे केली तसेच शिवकालीन संस्कार, मातृत्व व राष्ट्रप्रेम याविषयी आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी शिक्षकांनी राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या घडणीत दिलेल्या संस्कारांचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त, स्वाभिमान व कर्तव्यभावना रुजविण्याचे कार्य राजमाता जिजाऊ यांच्या विचारांतून घडते, असे मार्गदर्शन करण्यात आले.

# रविवारी अलिबाग येथे ऑफ्रोहचा महिला मेळावा

अलिबाग -

ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन, ( ऑफ्रोह) महाराष्ट्र शाखा रायगड, ठाणे व ऑफ्रोह महिला आघाडीच्या वतीने या वर्षी विभागीय महिला मेळावा, सर्वसाधारण सभा व महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम घेण्याचे ठरवले आहे. हा विभागीय महिला मेळावा रविवारी ( दि . १८ ) सकाळी १०.३० वाजता अलिबाग, येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अलिबाग-मुरूडचे आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परीषदेचे माजी समाज कल्याण सभापती दिलीप भोईर, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, पोलीस अधिक्षक आंचल दलाल उपसथित राहणार आहेत. तर प्रमुख व्याख्याते म्हणून गितांजलीताई कोळी, ऑफ्रोहचे मार्गदर्शक सुधाकर सुसलादी, दत्ताभाऊ सुरवसे,उपस्थित राहणार आहेत.

# आरपीआयदेखील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या रिंगणात



**कर्जत : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि कर्जत पंचायत समिती निवडणुकांसाठी आरपीआयची कंबर कसली आहे. आरपीआय आठवले गटाला सन्मानजनक जागा मिळाल्यास युती केली जाईल. असा निर्धार आरपीआय कर्जत तालुका बैठकीत करण्यात आला.

कर्जत तालुक्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत निवडणुकीची रणनीती आणि संभाव्य आघाड्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. डिकसळ येथे झालेल्या कार्यक्रमाला आरपीआय तालुका अध्यक्ष मनोज गायकवाड, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष मारुती गायकवाड, यांच्यासह अॅड. उत्तम गायकवाड, अरविंद मोरे, राहुल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीला कर्जत तालुक्यातील आरपीआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीनंतर पक्षाचे पदाधिकारी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना पक्षाची भूमिका स्पष्ट केली. जो पक्ष आरपीआयला सन्मानाने वागणूक देईल आणि जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या जागा सोडेल, त्यांच्यासोबतच युती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# निवी येथे महाराष्ट्रातील पहिल्या जपानी तंत्रज्ञान फिल्टरचे लोकार्पण



**धाटाव : प्रतिनिधी**

वरसे ग्रा.पंचायत हद्दीतील निवी गाव, वाडीपाड्यात जपानी तंत्रज्ञानातून बसविण्यात आलेल्या युव्ही फिल्टर प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा निवी येथे सोमवारी पार पडला. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या सीएसआर सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत हा नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी होण्यावर शिक्कामार्फत झाले.

जपानमधील स्टॅन्ली कंपनीने विकसीत केलेला अद्यायावत तंत्रज्ञान असलेला फिल्टर बसवलेला निवी हा गाव महाराष्ट्रातील पहिल्याच ठरला आहे. निवी गावाची प्रथम निवड करण्यात आल्याचे समोर आले. ग्रामस्थांना निर्जंतुक पाणी मिळावे यासाठी जायका व ओरिजनल इंजीनियरिंग कन्सल्टंट लिमिटेड यांनी आर्थिक पाठबळ दिले. श्री विवेकानंद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूटने सहकार्य केले. याच युव्ही फिल्टरचा लोकार्पण सोहळा विदेशी पाहुणे व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. सोहळ्याला निवी ग्रामस्थ, महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

निवी येथे युव्ही फिल्टर लोकार्पण सोहळ्याला स्टॅन्ली कंपनीचे अध्यक्ष मासाहीकी इंचिचानगी सन, टोनी सन, युवासाकी सन, उगियोरा सन, एक्सेल कंपनीचे सेक्रेटरी सुरेंद्र संघवी, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, माजी सरपंच अमित मोहिते, राजा सन, जायका कंपनीचे युसुके सातो सन, ओरिजनल इंजिनिरिंग कन्सल्टंटचे यामुनाची सन, हाचाकावा सन, श्री विवेकानंद रिसर्चचे सुशिल रुळेकर, ग्रामस्थ उपस्थित होते.

पंचायत समिती रोहा यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण २१५ लहान मोठे युनिट क्षमता असणाऱ्या दोन प्रकारचे पाणी फिल्टर निवी गाव, निवी आदिवासी, ठाकूरवाडी तसेच शासकीय रुग्णालय अशा सर्व सार्वजनिक ठिकाणी बसवण्यात आले. जवळपास ३ वर्षे या प्रकल्पावर काम करत विविध चाचण्या, ट्रायल घेतल्यानंतर यश मिळाले, याच संशोधन प्रक्रियेची माहिती लोकार्पण सोहळ्यात देण्यात आली.

युव्ही फिल्टरचे फायदे, तोटे याचे प्रत्यक्ष रिपोर्ट दाखवण्यात आले. जपान तंत्रज्ञान वापरून तयार केलेला फिल्टर कमी दरात कसे उपलब्ध करता येईल याबाबत प्रयत्न असल्याचे उपस्थित विदेशी संशोधकांनी सांगितले. निवी गाव, वाडीपाडांना आरोग्यमय स्वच्छ पाणी युव्ही फिल्टर उपलब्ध करून देले. याबद्दल माजी सरपंच अमित मोहिते व ग्रामस्थांनी जपानी तंत्रज्ञ, एक्सेल कंपनी सीएसआर उपक्रमाचे कौतुक करत आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त अलिबागमध्ये अमली पदार्थमुक्त भारतासाठी भव्य रॅली



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वामी विवेकानंद जयंती व १२ जानेवारी राष्ट्रीय युवा दिनानिमित्त अमली पदार्थमुक्त भारत या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांच्या विद्यमाने अलिबागमध्ये भव्य जनजागृती रॅली कार्यक्रम (दि.१२ जानेवारी) रोजी रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय युवा दिनानिमित्त अलिबागमध्ये अमली पदार्थमुक्त भारतासाठी भव्य रॅली व पथनाट्य कार्यक्रम संपन्न झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, अलिबाग येथून या रॅलीची सुरुवात झाली, तर रॅलीचा समारोप अलिबाग समुद्रकिनारा येथे करण्यात आला.

या रॅलीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सेंट मेरी शाळा, अरुणकुमार वैद्य जूनियर कॉलेज, दत्ता पाटील विधी महाविद्यालय, जे.एस.एम.कॉलेज, लोकशिक्षण प्रसारक मंडळ महाविद्यालय चोंढी, शासकीय नर्सिंग कॉलेज, जिल्हा तंबाखू नियंत्रण विभाग, मानसिक आरोग्य विभाग, जिल्हा रुग्णालय रायगड-अलिबाग लायन्स क्लब श्रीबाग, आदी संस्थांचा सक्रिय सहभाग होता. तसेच शिक्षकेतर कर्मचारी, पॅनल वकील, विधी स्वयंसेवक, लोक अभिरक्षक कार्यालयाचे वकील यांची उपस्थिती लाभली.

रॅलीदरम्यान अलिबाग बस स्थानक येथे शासकीय नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी युवकांना होणाऱ्या नशेच्या दुष्परिणामांवर आधारित प्रभावी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून नशेमुळे तरुणांचे आरोग्य, शिक्षण व भविष्य कसे धोक्यात येते, हे वास्तववादी पद्धतीने सादर करण्यात आले.

रॅलीच्या समारोपप्रसंगी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर सेंट मेरी कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारत विषयावर आणखी एक प्रभावी पथनाट्य सादर करून अमली पदार्थांचे दुष्परिणाम समाजासमोर ठळकपणे मांडले.

# मुंबईचा गुजरातवर दमदार विजय

## कर्णधार हरमनप्रीतची धडाकेबाज खेळी



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गुजरातच्या संघाने डब्ल्यूपीएल सामन्यात १९२ धावा फटकावल्या होत्या. त्यामुळे मुंबईचा संघ दुसरा सामनाही हरणार, असे काही जणांना वाटत होते, पण हरमनप्रीत कौरच्या तुफानी खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सला गुजरातच्या संघावर सात विकेट्स राखून दमदार विजय मिळवता आला.

हरमनप्रीतने ४३ चेंडूंत नाबाद ७१ धावा केल्या, ज्यामध्ये तिने सात चौकार आणि एक षटकार लगावला. गुजरातच्या १९३ धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची कामगिरी चांगली झाली नाही, कारण गेल्या सामन्यात धडाकेबाज फटकेबाजी करणारी गुनालन कामिलिनी या वेळी मोठी खेळी साकारण्यात अपयशी ठरली. कामलिनी १३ धावांवर बाद झाली आणि मुंबईला पहिला धक्का बसला.

मुंबईची हिली मॅथ्यूजही २२ धावांवर बाद झाली, त्यामुळे मुंबईची २ बाद ३७ अशी अवस्था झाली होती, पण त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर फलंदाजीला आली आणि तिने धावांचा वेग वाढवला. हरमनप्रीतला अमनज्योत सिंगची चांगली साथ मिळाली. अमनज्योतने २६ चेंडूंत सात चौकारांच्या जोरावर ४० धावांची दमदार खेळी साकारली. तिचे अर्धशतक १० धावांनी हुकले. मुंबईची सेट झालेली खेळाडू बाद झाली खरी, पण हरमनप्रीतने संघाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. हरमनप्रीत कौरला या सामन्यात दैवानेही चांगली साथ दिली, कारण तिला दोनदा जीवदान मिळाले. हरमनप्रीतने या जीवदानांचा चांगलाच फायदा उचलला आणि आपले अर्धशतक साजरे केले.

या स्पर्धेतील सर्वाधिक अर्धशतकांचा विक्रम तिने आपल्या नावावर केला. त्याचबरोबर या स्पर्धेतील एक हजार धावाही तिने पूर्ण केल्या. त्यामुळे हरमनप्रीत कौरसाठी हा सामना सर्वात खास ठरला. तत्पूर्वी मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांची या सामन्यात गुजरातच्या संघाने चांगलीच धुलाई केल्याचे पहायला मिळाले. गुजरातच्या एकाही खेळाडूने अर्धशतक झळकावलं नाही, पण तरीही त्यांनी १९२ धावांचा डोंगर उभारला.

गुजरातच्या भारती फुलमाळीने फक्त १५ चेंडूंत तीन चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर नाबाद ३६ धावांची तुफानी खेळी साकारली. भारतीला जॉर्जिया वॅरेहमने ३३ चेंडूंत नाबाद ४३ धावांची खेळी साकारत चांगली साथ दिली.

# आज राज्य क्रीडा दिनाचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ऑलिम्पिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिनानिमित्त रायगड जिल्ह्याचा राज्य क्रीडा दिन १५ जानेवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, कळंबोली नवी मुंबई येथे सायंकाळी ५.०० वाजता साजरा करण्यात येणार असून या राज्य क्रीडा दिनी रायगड जिल्ह्यातील सन २०२५-२६ मध्ये सर्व राष्ट्रीय, राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू तसेच राष्ट्रीय शालेय पदक विजेते खेळाडू यांना विविध मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व दिवंगत खाशाबा जाधव यांच्या क्रीडा कामगिरी व कार्याचा परिचय होण्यासाठी त्यांच्या जीवनावर आधारीत पुस्तकाचे वितरण केले जाणार असून या राज्यस्तरीय कार्यक्रमास खेळाडू आणि क्रीडा प्रेमींनी मोठ्या प्रमाणात सहभागी, व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

**आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय विशेष प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा होणार गौरव सोहळा**

स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते म्हणून ज्यांचा संपूर्ण भारताला अभिमान आहे असे महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिकमध्ये केलेल्या कामगिरीचा गौरव व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांचा जन्मदिन दि.१५ जानेवारी, हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याकरिता शासनाने मान्यता दिली आहे. या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील प्रत्येक शाळा महाविद्यालयातून राज्य कीडा दिन साजरा करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.

याकरिता अनुदानित, विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यापीठे, एकविध जिल्हा/राज्य क्रीडा संघटना, क्रिडा मंडळे, क्रिडा अकॅडमी, शासनाच्या क्रीड़ा योजनांचा लाभ मिळालेल्या सर्व अनुदानित संस्था यांनी आपल्या क्षेत्रात राज्य क्रीडा दिन मोठ्या प्रमाणात साजरा करावा तसेच राज्य क्रीडा दिनाचे औचित्य साधून दिवंगत खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान यावर व्याख्यानाचे आयोजन करणे, क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे तसेच मॅरेथॉनचे आयोजन करणे, विविध खेळांचे प्रदर्शनीय सामने आयोजित व विजेत्यांना पुरस्कार वितरण करणे, खेळाडूं समवेत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

# उरण महाविद्यालयात क्रीडा सप्ताह

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण - रायगड, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर व्ही. व्ही. गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली ८ ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत कोटगाव ग्राम सुधारणा खेळाचे मैदान या ठिकाणी क्रीडा सप्ताह झाला.



क्रीडा सप्ताहासाठी महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा.इंदुलकर व प्रा.आर. टी. ठवरे हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून कोटगाव ग्राम सुधारणा मंडळाचे अध्यक्ष जयेश भोईर हे उपस्थित होते. क्रीडा सप्ताहमध्ये क्रिकेट, खो- खो, कबड्डी, फुटबॉल या सांघिक खेळासह धावणे, उंच उडी ,लांब उडी, थाळीफेक, भालाफेक, गोळा फेक, चेस, कॅरम बॅडमिंटन इत्यादी वैयक्तिक स्पर्धाही घेण्यात आल्या. विजेत्या खेळाडूंना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सदर क्रीडा सप्ताहात बहुसंख्येने सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासकीय कर्मचारी वृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनी केले व पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय डॉ. ए. आर. चव्हाण यांनी केले व आभार प्रदर्शन प्राध्यापिका विनिता तांडेल यांनी केले आणि सूत्रसंचालन डॉ. एमजी लोणे यांनी केले.

# रसायनी पिल्लईत ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल निवड चाचणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीय खेल प्राधिकरण (SAI) अंतर्गत खेलो इंडिया सेंटर, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्ले एच.ओ.सी. इंटरनॅशनल स्कूल, रसायनीत ॲथलेटिक्स व व्हॉलीबॉल या खेळांसाठी वर्ष २०२६-२७ साठी निवड चाचणी ठेवण्यात आली आहे.



ही निवड चाचणी दिनांक ३ ते ४ फेब्रुवारी रोजी खेलो इंडिया सेंटर, एच. ओ. सी. इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर आयोजित केली आहे. तरी वयोगट १० ते १६ वर्ष वय असलेल्या मुला मुलींना या खेळांमध्ये विविध जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या प्रमाणपत्रांसह सकाळी ८:३० वाजता आपल्या मुळ जन्म तारखेचा दाखला, रहवासी दाखला, आधार कार्ड आणि यांचे ०२ झेरॉक्स सेट तसेच पासपोर्ट साईज ०५ फोटो घेऊन एच. ओ. सी. इंटरनॅशनल स्कुलचे मैदान येथे उपस्थित राहावे. यासाठी पत्ता पिल्ले एच.ओ.सी. एज्युकेशनल कॅम्पस, एच.ओ. सी. इंटरनॅशनल स्कूल, रसायनी, तालुका- खालापूर, जिल्हा रायगड ४१०२०७ आहे. निवड झालेल्या खेळाडूंना महात्मा एज्युकेशन संस्थेकडून निवासाची व जेवणाची व्यवस्था करण्यात येईल तसेच मोफत प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा भत्ता, खेळाचे साहित्य हे स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडून मिळेल. तरी य संधीचा इच्छुक खेळाडूंनी लाभ घ्यावा,असे आवाहन एचओसी पिल्लई कडून करण्यात आले आहे.

यासाठी कृष्णात पाटील (थलेटिक्स कोच) - ९७६५६३१४७७, अनु कृष्णन (ॲथलेटिक्स कोच) - ६२८२४४८२२४, मनोज सिगु (व्हॉलीबॉल कोच)-८३६९४५२९५० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वनडेचा किंग विराट कोहली वर्ल्ड नंबर वन!

## रोहित शर्माला टाकेल मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसीने ताजी वनडे रँकिंग जाहीर केली आहे. यामध्ये विराट कोहलीसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. २०२६ ची सुरूवात विराट कोहलीने दणक्यात केली असून आयसीसी वनडे रँकिंगमध्ये आता विराट जगातील नंबर वन फलंदाज ठरला आहे. भारत विरुद्ध न्यूझीलंड एकदिवसीय मालिकेदरम्यान क्रमवारीत काही महत्त्वाचे बदल दिसून येत आहेत. ही मालिका सध्या सुरू असल्याने पुढे आणखी बदल दिसून येतील.

आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत विराट कोहली नंबर वन फलंदाज बनला आहे. २०२६ च्या पहिल्याच सामन्यात विराट कोहलीने न्यूझीलंडविरुद्ध ९३ धावांची शानदार खेळी केली. गेल्या ५ सामन्यांमध्ये कोहलीने विराट अंदाजात फलंदाजी करत खोऱ्याने धावा केल्या आहेत. विराटच्या आक्रमक अंदाजातील फटकेबाजी आणि सलग पाच सामन्यांमध्ये ५० अधिक धावांच्या खेळीमुळे तो पहिल्या स्थानी पोहोचला आहे.



विराट कोहलीने रोहित शर्माला मागे टाकत पहिलं स्थान गाठलं आहे. विराट कोहली ७८५ गुणांसह पहिल्या स्थानी पोहोचला आहे. विराट कोहलीने ५ वर्षांनतर वनडेमध्ये पहिलं स्थान गाठलं आहे. दरम्यान, न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेललाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७८४ च्या रेटिंगसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर रोहित शर्मा थेट तिसऱ्या स्थानी घसरला आहे.

विराट कोहली चार वर्षे आणि नऊ महिन्यांनंतर पुन्हा एकदा नंबर वन फलंदाज बनला आहे. दिवसांच्या बाबतीत, १७३६ दिवसांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर हा खेळाडू एकदिवसीय क्रमवारीत शिखरावर पोहोचला आहे. यापूर्वी, विराट कोहली १३ एप्रिल २०२१ पर्यंत एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थानावर होता, त्यानंतर १४ एप्रिलला त्याची जागा पाकिस्तानी फलंदाज बाबर आझमने घेतली. कोहलीने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन शतकं आणि एक अर्धशतक झळकावलं. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात त्याने ९३ धावांची खेळी केली, यानंतर विराट वर्ल्ड नंबर वन होणार हे निश्चित झालं.

वनडेचा किंग विराट कोहलीने गेल्या पाच सामन्यात ७३, १३५, १०२, ६५ आणि ९३ अशा वादळी खेळी केल्या आहेत. आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत विराट कोहली ७८५ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे. न्यूझीलंडचा फलंदाज डॅरिल मिचेल ७८४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. रोहित शर्मा ७७५ रेटिंग गुणांसह तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. शुबमन गिल पाचव्या स्थानावर आहे आणि श्रेयस अय्यर १० व्या स्थानावर आहे.

# नागपूरच्या अल्फिया पठाणला राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण



**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर विभागासाठी अभिमानास्पद ठरणारी कामगिरी करत मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकीट तपासनीस (टीटीई) म्हणून कार्यरत असलेल्या अल्फिया पठाण हिने ९ व्या एलिट सीनियर राष्ट्रीय पुरुष व महिला बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. उत्तर प्रदेशातील नोएडा येथे नुकत्याच पार पडलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतीय रेल्वेचे प्रतिनिधित्व करताना अल्फियाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

अंतिम फेरीत हरियाणाच्या बलाढ्य प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव करत अल्फियाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या विजयामुळे केवळ भारतीय रेल्वेच नव्हे, तर विशेषतः मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर वाढला आहे. खेळातील तिची चिकाटी, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वास यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अल्फियाच्या या यशामागे संघर्षाची आणि जिद्दीची दीर्घ कहाणी आहे. २०१४ साली प्रदर्शित झालेल्या महिला बॉक्सर मेरी कॉम यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाचा तिच्यावर खोल परिणाम झाला. त्याच काळात प्रशिक्षक पुरोहित यांनी दाखवलेला विश्वासही तिच्यासाठी निर्णायक ठरला. तो चित्रपट पाहिल्यानंतर मला वाटले की आपणही हे करू शकतो, असे अल्फिया सांगते.



# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्री धावीर रोहा संघ प्रथम

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्यावतीने श्री वरदायिनी क्रीडा मंडळ राबगाव यांच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्री धावीर रोहा संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मातृछाया कुडूस, तृतीय क्रमांक पांडबादेवी रायवाडी, चतुर्थ क्रमांक जय बजरंग रोहा या संघाने पटकावला आहे.

या स्पर्धेत वैयक्तिक बक्षिसामध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू अनिरुद्ध भोसले (धावीर रोहा), उत्कृष्ट चढाई निखिल शिर्के ( कुडूस), उत्कृष्ट पक्कड राकेश गायकवाड (जय बजरंग रोहा) पब्लिक हिरो समाधान मोरे रायवाडी आदिला बक्षीस देण्यात आले.

श्री धावीर रोहा संघाने पारितोषिक पटकावल्यानंतर कर्णधार गौरव नाईक व संस्थापक उत्तम नाईक यांनी संघाचे अभिनंदन केले.

# आयपीएलमधील आरसीबीच्या काही 'होम मॅचेस' इतरत्र?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बगळुरू संघाबाबत आयपीएल २०२६च्या हंगामापूर्वी एक मोठी बातमी समोर येत आहे. आरसीबीचा संघ आगामी हंगामात आपले काही 'होम मॅचेस' (घरचे सामने) बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमऐवजी इतर शहरांमध्ये खेळण्याची शक्यता आहे.

आरसीबीने आपले घरचे सामने बंगळुरूबाहेर नेण्यामागे नेमके काय कारण आहे याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही, मात्र चिन्नास्वामी स्टेडियममधील नूतनीकरणाची कामे किंवा इतर तांत्रिक कारणांमुळे हा बदल केला जाऊ शकतो, अशी चर्चा आहे. यापूर्वी अनेक आयपीएल संघांनी आपल्या चाहत्यांचा विस्तार करण्यासाठी आणि विविध प्रेक्षकांपर्यंत पोहचण्यासाठी 'दुसऱ्या होम ग्राउंड'ची संकल्पना राबवली आहे. लवकरच आयपीएल २०२६चे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर या बदलांवर अधिकृत शिक्कामोर्तब होईल. सध्या तरी या वृत्ताने सोशल मीडियावर क्रिकेट चाहत्यांच्या चर्चेला उधाण आणले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, नवी मुंबई आणि रायपूर या दोन शहरांची नावे आरसीबीचे नवे होम ग्राऊंड म्हणून आघाडीवर आहेत. नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियम हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान असून येथे मोठ्या प्रमाणावर प्रेक्षक क्षमता आहे तसेच मुंबई आणि आसपासच्या परिसरात आरसीबीचा मोठा चाहता वर्ग असल्याने येथे सामने खेळवणे फायदेशीर ठरू शकते. दुसरे म्हणजे छत्तीसगडची राजधानी रायपूर येथील स्टेडियम हे भारतातील सर्वात मोठ्या स्टेडियमपैकी एक आहे. येथे आयपीएलचे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची प्रचंड गर्दी होते. या शहरात आयपीएलचा कोणताही संघ नसल्यामुळे आरसीबीला तेथे नवीन चाहता वर्ग मिळण्याची मोठी संधी आहे.

# चार परदेशी खेळाडूंना भारताचा व्हिसा नाकारला

## 'पाकिस्तान कनेक्शन' पडले महागात

**नवी दिल्ली** : भारत व श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६पूर्वी एक मोठा वाद निर्माण झाला आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतात येणाऱ्या अमेरिकेच्या (यूएसए) क्रिकेट संघातील चार प्रमुख खेळाडूंचे व्हिसा अर्ज नाकारण्यात आले आहेत. यामध्ये संघाचा स्टार वेगवान गोलंदाज अली खान आणि फलंदाज शायन जहांगीर यांचा समावेश असून त्यांच्या 'पाकिस्तान कनेक्शन'मुळे ही अडचण निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार व्हिसा नाकारण्यात आलेल्या चारही खेळाडूंचे मूळ पाकिस्तानशी संबंधित आहे. अली खान आणि शायन जहांगीर हे दोघेही मूळचे पाकिस्तानी नागरिक आहेत, जे नंतर अमेरिकेत स्थायिक झाले आणि आता अमेरिकन राष्ट्रीय संघाकडून खेळतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण राजकीय संबंधांमुळे पाकिस्तानी वंशाच्या व्यक्तींना भारतीय व्हिसा मिळवण्यासाठी कडक सुरक्षा तपासणी आणि प्रदीर्घ प्रक्रियेतून जावे लागते.

# बीसीबी म्हणते, भारतात क्रिकेट खेळणार नाही!

**ढाका : वृत्तसंस्था**

एकीकडे आपल्या देशात हिंदूंना लक्ष्य करणारे बांगलादेशने भारतात क्रिकेट न खेळण्याचे आपले रडगाणे सुरूच ठेवले आहे. २०२६च्या टी-२० विश्वचषकासाठी भारतात खेळणार नसल्याचा पुनरूच्चार बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेसोबतच्या (आयसीसी) बैठकीत केला आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आणि बीसीबीमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यासाठी आयसीसीने मंगळवारी बीसीबीसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेतली. या वेळी ७ फेब्रुवारी ते ८ मार्चदरम्यान भारत आणि श्रीलंकेत खेळल्या जाणाऱ्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६मध्ये बांगलादेशच्या राष्ट्रीय पुरुष संघाच्या सहभागावर चर्चा करण्यात आली. या बैठकीला बीसीबीचे अध्यक्ष मोहम्मद अमीनुल इस्लाम, उपाध्यक्ष मोहम्मद शकावत हुसेन आणि फारूक अहमद, संचालक आणि क्रिकेट ऑपरेशन्स समितीचे अध्यक्ष नझमुल अबेदीन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निजामुद्दीन चौधरी उपस्थित होते, अशी माहिती बीसीबीने एका प्रसिद्धीपत्रकात दिली आहे. बांगलादेशचे सामने भारतातील ठिकाणांव्यतिरिक्त इतरत्र आयोजित करण्याचा विचार करावा, असे आवाहन बोर्डाने पुन्हा एकदा आयसीसीला केले.

### भूमिकेचा पुनर्विचार करण्याची आयसीसीची सूचना

आयसीसीने स्पर्धेचे वेळापत्रक आणि कार्यक्रम आधीच निश्चित झाल्याचे निर्दशनास आणून दिले आणि बीसीबीला आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करण्यास सांगितले. या सूचनेनंतरही बांगलादेश बोर्ड आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. आपल्या खेळाडू, अधिकारी आणि सपोर्ट स्टाफची सुरक्षा आणि कल्याण हीच आपली सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे पालुपद लावले. संभाव्य तोडगा काढण्यासाठी आणि परस्पर स्वीकारार्ह निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी चर्चा सुरू ठेवण्यास बीसीबी आणि आयसीसी दोन्ही सहमत झाले आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com